# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १२ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०६/०७/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०६/०७/२०१९ शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | कापसे मयुर चंद्रकांत |
| ढेकळे सदाशिव गणपत | पाटील प्रतिभा सुधिर |
| बेंडाळे उज्वला मोहन | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | भंगाळे विष्णू रामदास |
| खडके सुनिल वामनराव | बरडे नितीन मनोहर |
| कोल्हे प्रविण रामदास | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सनकत चेतन गणेश | |

सदर सभेस, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

नगरसचिव :- सभेला सुरुवात करणेत येत आहे.

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय १ ते ४ विषय मंजुर करुन घ्या.

श्री.भगत बालाणी :- इतिवृत्तात दुरुस्ती आहे. स्थायी समिती सभा ठराव क्र.९४ दि.१५/०६/२०१९ अन्वये मंजुरी देण्यात आलेली होती. सदरच्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५(२)(२) असे नमुद करुन दुरुस्ती करण्यात यावी.

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.१५/०६/२०१९ व दि.२०/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.१५/०६/२०१९ रोजी झालेल्या स्थायी समिती विषय क्र.४ ठराव क्रं.९४ दि.१५/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम.एच-१९ एम ९२०० (मैला व्हेईकल) या वाहनाची मेजर दुरुस्ती करणे कामी रक्कम रु.६२,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे परंतू सदर दि.१५/०६/२०१९ चे कार्यवृत्त कायम करतांना उक्त विषया चे संदर्भात सदर ठिकाणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५ (२)(२) नुसार कार्यवाही करण्यात यावी हे वाक्य समाविष्ट करुन तशी कार्यवृत्तात दुरुस्ती करण्यात येवुन दि.१५/०६/२१९ रोजी चे कार्यवृत्त कायम करणेस तसेच दि.२०/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :- श्री. सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** महानगरपालिका दवाखाना विभागात शस्त्रक्रियानिहायक मानधनावर सेवा देत असलेल्या स्त्री रोग तज्ञ व भुलतज्ञांना मानधन वाढवून देणेबबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका दवाखाना विभागात 1) डॉ. सुजाता महाजन, 2) डॉ. तिलोत्तमा गाजरे, 3) डॉ. तुषार उपाध्ये, 4) डॉ. पुनम दुसाने, (स्त्री रोग तज्ञ), 1) डॉ. विनोद किनगे, 2) डॉ. रोहिनी चौधरी, 3) डॉ. स्वप्ना दातार, 4) डॉ. वंदना चौधरी, 5) डॉ. धिरज चौधरी, (भुलतज्ञ) शस्त्रक्रिया निहायक मानधनावर सेवा देत आहेत.

स्थायी समिती ठराव क्र. 15 दि. 05/07/2004 अन्वये प्रत्येक शस्त्रक्रियेसाठी स्त्री रोग तज्ञ व भुलतज्ञ यांना शस्त्रक्रिया निहायक रु. 600/- मानधन देण्यात येत आहे. तसेच फॉरसेक डिलेव्हरीसाठी (चिमटयाव्दारे प्रसुती) प्रत्येकी रु. 300/- मानधन देण्यात येते.

दि. 31/10/2018 चे विनंती अर्जानुसार सदर मानसेवी तज्ञांनी मानधन वाढीसाठी अर्ज सादर केलेला आहे. सदर मानसेवी तज्ञ अनेक वर्षापासून वरीलप्रमाणे शस्त्रक्रिया निहायक रु. 600/- घेऊन सेवा देत आहे ते मानधन वाढवून रु. 2000/- व चिमटयाने कराव्या लागणाऱ्या प्रसुतीसाठी प्रत्येकी प्रसुती निहाय रु. 1000/- मिळणेबाबत अर्जात नमुद आहे.

म.न.पा. दवाखान्यात यांची तत्पर सेवा पाहता व शहरातील इतर दवाखान्यांचे दर लक्षात घेता त्यांना मिळणारे मानधन अत्यल्प असून त्यांचे मागणीनुसार मानधन वाढवून देणेस हरकत नसल्याने तसेच मानसेवी तज्ञांना देण्यात येणाऱ्या मानधनापोटी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे. मानधन वाढीनंतर दरवर्षी अंदाजे एक लाखापर्यंत खर्चात वाढ अपेक्षित आहे. तसेच ठरविलेल्या रकमेवर दरवर्षी 01 एप्रिल पासून 10% वाढ करणेबाबत प्रशासनाने प्रस्तावात नमूद केले आहे.

दवाखाना विभागात मानधनावर सेवा देत असलेल्या भुलतज्ञ व स्त्रि रोग तज्ञ डॉक्टरांना स्थायी समिती ठराव क्र. 15 दि. 05/07/2004 अन्वये मानधन अदा करण्यात येत आहे. तरी यापूढे सिजेरियन ऑपरेशनसाठी शस्त्रक्रिया निहायक रु. 600/- ऐवजी रु. 1000/- व फॉरसेक डिलेव्हरीसाठी रु. 300/- ऐवजी रु. 500/- याप्रमाणे (प्रति पेशन्ट) वाढ करणेस तसेच सदर मानधनात दरवर्षी 10% प्रमाणे वाढ करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने ठरावाच्या दिनांकापासून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वाढ करावी. तसेच सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** म.न.पा.कै.भिकमचंद जैन दवाखाना शिवाजीनगर येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटरची कलम ५ (२)(२) अन्वये अधिकृत सर्व्हिस एजन्सीकडून सर्व्हिसिंग व इतर अनुषंगिक दुरुस्तीचे काम करणे कामी रक्कम रु.३०,८९३/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा.कै.भिकमचंद जैन दवाखाना शिवाजीनगर येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटर सन २०१० साली बसविण्यात आले आहे. सदर जनरेटरची आवश्यकतेनुसार वेळावेळी महिंद्रा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस एजन्सीकडून सर्व्हिसिंग करण्यात येत असते. यापुर्वीची सर्व्हिसींग करणेस सुमारे १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सदर जनरेटरची सर्व्हिसिंग करणे आवश्यक आहे.

सदर जनरेटरची महिंद्रा कंपनीची अधिकृत सर्व्हिस एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एंटरप्राईजेस, जळगांव यांचेकडून तपासणी केली असता सदर जनरेटरच्या सर्व्हिसिंगच्या कामासोबतच जनरेटरचा सॉलेनाईट स्विच व इग्निशियन स्टार्टर मोटर देखिल नादुरुस्त व निकामी झालेले असल्याने ते देखील नविन बसविणे आवश्यक आहे. तसेच सर्व्हिसिंग सोबतच जनरेटर दुरुस्तीची काही अनुषंगिक कामे देखील करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने स्वप्नगंध एंटरप्राईजेस यांनी त्यांचेकडील दि.०८/०३/२०१९ रोजीचे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST सह एकुण रु.३०,८९३/- रुपयांचा खर्च म.न.पा.कडे सादर केलेला आहे. तसेच अधिकृत वितरक यांनी १००% रक्कमेची मागणी मटेरियल डिलेव्हरी करते वेळी अदा करणेची मागणी केलेली आहे.

म.न.पा.कै.भिकमचंद जैन दवाखाना शिवाजी नगर येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटर सर्व्हिसिंग करणे, जनरेटरची सॉलिनाईट स्विच व इग्निशियन स्टार्टर मोटर नविन बसविणे व इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे कामी विविध साहित्य (स्पेअर पार्ट) व लेबर चार्जेस, जॉबवर्क इत्यादीसह महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एन्टप्राईजेस जळगांव यांचे वरील प्रमाणे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST टॅक्स सह एकुण रु.३०,८९३/- रुपये खर्च अपेक्षित आहे. सदर दवाखान्यातील वैदयकीय सेवे कामी आवश्यक पर्यायी विजपुरवठयाची निकड लक्षात घेता जनरेटरची वरील प्रमाणे सर्व्हिसिंग व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरचे काम विदयुत विभागातंर्गत जनरेटर व्यवस्था व दुरुस्ती तसेच ट्राफिक सिग्नल व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी म.न.पा.कै.भिकमचंद जैन दवाखाना शिवाजी नगर येथील १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटरची सर्व्हिसिंग व अनुषंगिक दृष्टीचे काम महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी स्वप्नगंधा एन्टरप्राईजेस जळगांव

यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम नुसार प्रकरण ५ मधील नियम २ (२) चे परंतुकात नमुद तरतुदी अन्वये निविदा न मागविता त्यांचे प्रोफार्मा इनव्हाईस नुसार करुन घेणेस व त्या कामी येणाऱ्या एकुण रु.३०,८९३/- चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मक्तेदाराशी संविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणेत येत आहे तसेच प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री. कापसे मयुर चंद्रकांत**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटरची कलम ५ (२)(२) अन्वये अधिकृत सर्व्हिस एजन्सीकडून सर्व्हिसिंग व इतर अनुषंगिक दुरुस्तीचे काम करणे कामी रक्कम रु.१९,८१५/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटर सन २०१० साली बसविण्यात आले आहे. सदर जनरेटरची आवश्यकतेनुसार वेळावेळी महिंद्रा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस एजन्सीकडून सर्व्हिसिंग करण्यात येत असते. यापुर्वीची सर्व्हिसींग करणेस सुमारे १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सदर जनरेटरची सर्व्हिसिंग करणे आवश्यक आहे.

सदर जनरेटरची महिंद्रा कंपनीची अधिकृत सर्व्हिस एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एंटरप्राईजेस, जळगांव यांचेकडून तपासणी केली असता सदर जनरेटरच्या सर्व्हिसिंग सोबतच सर्व्हिसिंग कामी लागणारे आवश्यक साहित्य नविन बसवावे लागेल तसेच जनरेटरची दुरुस्तीची काही अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने स्वप्नगंध एंटरप्राईजेस यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीचे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST सह एकुण रु.१९,८१५/- रुपयांचा खर्च म.न.पा.कडे सादर केलेला आहे. तसेच अधिकृत वितरक यांनी १००% रक्कमेची मागणी मटेरियल डिलेव्हरी करते वेळी अदा करणेची मागणी केलेली आहे.

म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले महिंद्रा कंपनीचे १५ KVA क्षमतेचे जनरेटरचे सॉलिनाईट स्विच, बॅटरी चार्जर इत्यादी नविन बसविणे व इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे कामी विविध साहित्य (स्पेअर पार्ट) व लेबर चार्जेस, जॉबवर्क इत्यादीसह महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एन्टप्राईजेस जळगांव यांचे वरील प्रमाणे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST टॅक्स सह एकुण रु.१९,८१५/- रुपये खर्च अपेक्षित आहे. सदर हॉस्पीटमधील वैदयकीय सेवे कामी आवश्यक पर्यायी विजपुरवठयाची निकड लक्षात घेता जनरेटरची वरील प्रमाणे सर्व्हिसिंग व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरचे काम विदयुत विभागातंर्गत जनरेटर व्यवस्था व दुरुस्ती तसेच ट्राफिक सिग्नल व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटरची सर्व्हिसिंग व अनुषंगिक दृष्टीचे काम महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी स्वप्नगंधा एन्टरप्राईजेस जळगांव यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम नुसार संविधा प्रकरण ५ मधील नियम २ (२) चे परंतुकात नमुद तरतुदी अन्वये निविदा न मागविता त्यांचे प्रोफार्मा इनव्हाईस नुसार करुन घेणेस व त्या कामी येणाऱ्या एकुण रु.१९,८१५/- चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मक्तेदाराशी संविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणेत येत आहे तसेच प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री. कापसे मयुर चंद्रकांत**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** ई-निविदा क्रं.१२३९ नुसार, ५ वर्षे कालावधीकरीता शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा, रस्त्यावरील कचरा घंटागाडीव्दारे संकलन व वाहतूक करणे व शहरातील दैनंदिन रस्ते, गटार इ.साफसफाई करणे करीता ४०० कामगार पुरवठा करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.७१.४८ कोटी मात्र चे खर्चास मान्यता मिळणेस तसेच मक्तेदार मे.वॉटर ग्रेस प्रोडक्शन, नाशिक यांचेशी संविदा करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- साधारणता घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाकडुन ३० कोटी ७५ लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. आणि त्याला प्रशासकीय मान्यता १ मार्च २०१८ रोजी मिळालेली होती. हा जवळपास दिड वर्षाचा कालावधी झालेला आहे प्रशासकीय मान्यता मिळवुन, ज्या पध्दतीने एकमुस्त कचरा संकलन दारोदारी जाऊन कचरा संकलनसाठी निविदा प्रक्रियेस आपण आज मान्यता देत आहोत. घनकचऱ्याच्या अनुषंगाने या शहराची सर्वात मोठी जी प्राथमिकता होती ती आहे आपला जे प्रकल्प आहे तेथे दिड पौनेदोन लाख टन कचरा जमा झालेला आहे. सगळयात महत्वाची बाब आहे त्या कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्लेवाट लावणे, आणि घनकचरा व्यवस्थापनाचा हा एक मुख्य उद्देश आहे की जमा झालेल्या कचऱ्याची विल्लेवाट लावणे. आज आपण ५ वर्षासाठी ७५ कोटी रुपयांचा मक्ता मंजुर करत आहे. ही प्राथमिकता नव्हती या शहराची आज ही निविदा मंजुर नाही झाली असती तरी ही आपली व्यवस्था चांगल्या पध्दतीने सुरु होती. म्हणजे काय झालेले आहे की पहिले आपण बाळ जन्माला घातले मग लग्नाची तारीख ठरवत आहोत. घनकचरा व्यवस्थापनास मान्यता मिळवुन दिड वर्ष झाले आणि घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सुरु होणे अत्यंत गरजेचे होते. आपण आपल्या ८५ गाडया मक्तेदाराला हस्तांतरीत करु आणि हस्तांतरीत केल्यानंतर तो कचरा जमा करणे . परंतु या कचऱ्यावर प्रक्रिया कुठे आहे. हा निर्णय योग्य आहे परंतु या पेक्षा तातडीने गरज आहे ती प्रकल्प उभारणीची. प्रकल्पाचा अजुन ठेका नाही आहे त्यात निविदा अजुन आलेल्या नाही आहे. त्यात ३ महिन्याचा वेळ जाईल, ६ महिने जातील किंवा वर्ष जाईल माहित नाही. आणि दिड वर्ष मध्ये प्रवास फक्त निविदा पर्यंत पोहचलेला आहे. काय स्थिती आहे केव्हा कार्यादेश दिले जातील. आचार संहिता आली तर किती वेळ लागेल. तरी हा मक्तेदार कचरा जमा करुन जशी आपली पध्दत सुरु आहे त्याच प्रमाणे सुरु ठेवेल. मक्त्या मध्ये आजच्या अस्तित्वातल्या खर्चापेक्षा दुपटीने खर्च होईल. स्वच्छ भारताच्या संकल्पनाने राज्य शासनाने जे अभियान सुरु केलेले आहे त्याचा उद्देशच साद्य होत नाही.

मा.सभापती :- पाटील साहेब बोला.

श्री.उदय पाटील :- आदरणीय सभापती, नितीन भाऊंनी जसे सांगीतले की, आपल्याला ३०.७५ कोटीचा निधी प्राप्त झालेला होता. त्यात जवळपास ८ कोटीत वाहन खरेदी होती. १३ कोटी प्रकल्पाचा स्थापत्य बांधकाम होता, ५ कोटीचा बायोगॅस प्लान्ट होता. असे ३०.७५ कोटीचा हा प्लान होता. त्या रकमेतुन जवळपास ८ कोटीची संपुर्ण वाहने खरेदी केलेली आहे. प्रकल्पाचा विषय प्रकल्प विभाग व शहर अभियंता यांच्याशी संबंधीत आहे.राहिला बायोमाईनींगचा विषय तर शासन निर्णय ज्यावेळेस आला, तर शासन निर्णयात त्यांनी स्पष्ट म्हटलेलं होते की बायोमाईनींगच्या प्रक्रिया राबवु नये या बाबत शासनाकडुन निर्देश देण्यात येतील. त्यामुळे हा विषय थांबला होता त्यानंतर शासनाकडुन १३ नोव्हेंबर २०१८ ला सुधारीत मान्यता शासनाने दिली. तांत्रिक मंजुरी घेऊन मोहिम राबवावी असे निर्देश दिले. आपल्याला तांत्रिक मान्यता ०२/०९/२०१९ ला मान्यता प्राप्त झाली. जे बायोमाईनींगचा पार्ट होता तो थांबलेला होता. शासन मंजुरी मिळाल्यानंतर आम्ही बायोमाईनींगची निविदा प्रक्रिया आता सुरु केली.

श्री.नितीन लढढा :- बायोमाईनींगच्या बाबतीत जे मार्गदर्शन अपेक्षित होते ते शासनाने नंतर दिले परंतु वाहन खरेदी करणे ही प्राथमिकता आहे की प्रकल्प उभारणी करणे ही प्राथमिकता आहे. जवळपास १ ते २ लाख टन कचरा तुमच्याकडे संकलीत झालेला आहे. बायोमाईनींग नंतरचा विषय आहे प्रकल्प जर कधी आज सुरु झाला असता,तर साधारणता वर्षभरात त्या कचऱ्यावर प्रक्रिया होणे अपेक्षित होते. प्राथमिकता कश्या बदलता, प्राथमिकता काय ते वाहने, वाहनांच्यामुळे आपला कचरा संकलनाचा विषय हा थांबलेला नव्हता, प्राथमिकता काय आहे ते समजने गरजेचे आहे, बघा आपण वेगवेगळया भागात राहतो परंतु निमखेडी भागात याच्या संदर्भात त्रास आहे आणि सातत्याने ती भुमिका वृत्तपत्राच्या माध्यमातुन महानगरपालिकेच्या माध्यमातुन सातत्याने मांडत असता. म्हणजे प्राथमिकता सोडुन वेगळया प्राथमिकतेला महत्व दिले जात आहे. कुठे तरी हे चुकीचे घडत आहे. आज ही मी म्हणतो ही जी निविदा प्रक्रिया आहे हे केव्हा पुर्ण होईल याची गॅरंटी सुध्दा कोणीही घेऊ शकणार नाही.

श्री.सुनिल भोळे :- भाऊ यासाठी आपण दोन वेळा निविदा काढली पण प्रतिसाद मिळाला नाही. तिसऱ्यांदा पुन्हा फेरनिविदा काढण्यासाठी फाईल आयुक्त साहेबांकडे ठेवण्यात आलेली आहे. आयुक्तसाहेब परवा दिल्लीला होते. ते म्हणाले की आपण काही लोकांशी चर्चा करु की का प्रतिसाद मिळत नाही. त्यानंतर तिसऱ्यांदा आपण प्रसिध्द करु.

श्री.नितीन लढढा :- प्रतिसाद मिळत नाही ही समस्या यायला नको, कारण याचा निधी राखीव आहे. हा मनपा फंडाचा विषय नाही . पण प्रतिसाद का मिळत नाही हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे.

मा.सभापती :- या विषया संदर्भात आपण विचार करु.

श्री.नितीन लढढा :- ह्या ८५ गाडया या संपुर्ण जळगांव शहरा मधला ओला कचरा सुका कचरा संकलीत करुन जेव्हा आणेल, या संकलीत केलेल्या कचऱ्याला शहरातील ४ ठिकाणी विविध भागामधील ४ ठिकाणी हा कचरा विभागला जाईल. त्यात एम.आय.डी.सी असेल, शहरातला मध्य भाग असेल, खाद फॅक्टरीचा भाग असेल, पिंप्राळा परिसरात असेल, याच्या मागची संकल्पना अशी आहे की या ठिकाणी तुम्हाला ओला कचरा आणि सुका कचरा वर्गीकरण करायचा आहे. प्रकल्प नाही आणि दुसरा ही जागा सुध्दा कन्स्ट्रक्ट झालेले नाही. स्मशानभुमी जवळ कचरा टाकला जातो, समजा स्मशानभुमी असुन त्या ठिकाणी वस्ती नाही , परंतु काही ठिकाण असे आहे ज्यांच्या जवळपास नागरी वस्ती आहे. आणि असे ठिकाणी तुम्ही ओला कचरा सुका कचऱ्याचा वर्गीकरण कराल तर नक्की नागरीकांच्या या संदर्भात तक्रारी येतील.

आरोग्यधिकारी :- आपण नगररचना विभागाचे इंजिनिअर, शहर अभियंता आणि आम्ही मिळुन हया जागा निश्चित केलेल्या होत्या. एक टी.बी.एस.हॉस्पीटलची जागा आहे, एक नेरीनाक्याची जागा, एक पिंप्राळा स्मशानभुमी जवळची जागा आणि एक पर्यायी शिवाजी नगर मध्ये आपला रिसोर्सचा भाग असे चारही जागा आपण निश्चित केलेली होती.

श्री.नितीन लढढा :- व्यवस्था काय आहे तिथे ? टि.बी.एस.जवळ शाळा आहे, स्वीमिंग टँक आहे, गायत्रीनगरची वस्ती आहे, अश्या उघड्या ठिकाणी तुम्ही वर्गीकरणाचे काम करणार का ? असे विविध कारणे आहे तर हा मक्तेदाराचा पैसा खिश्यातुन द्यायचा का ? व्यवस्था तर आज ही चालु आहे आपली व्यवस्था काही बंद पडलेली नाही. आपली वाहने सुरु आहे, मजुर सुरु आहे, कचरा उचलला जात आहे आणि ते जमा होत आहे तिथे, उद्दीष्ट हे आहे की, ओला कचरा सुका कचरा एका ठिकाणी जमा होऊन ओला कचरा हा कॅम्पॅक्टर द्वारे प्रकल्पात जावे, आणि प्रकल्पात जाऊन त्यावर प्रोसेस होऊन त्यावर खतामध्ये रुपांतर व्हायला पाहिजे,

मा.सभापती :- पाटील साहेब याच्यावर काय करता येईल, आयुक्त साहेब आणि आपण बसुन काही करायला पाहिजे.

आरोग्यधिकारी :- जबाबदाऱ्या वाटुन दिल्या होत्या. बांधकाम विभागाने त्यांचे काम करावे आणि आरोग्य विभागाने त्यांचे काम करावे. त्यांनी जर खुलासा केला तर जास्त योग्य होईल.

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय, २०१८ आणि आज ७ जुलै २०१९ तब्बल दिड वर्षाचा कालावधी आहे, दिड वर्षाच्या कालावधीमध्ये निधी प्राप्त झाल्यानंतर ही आजही प्रक्रिया काय आहे की निविदेला प्रतिसाद मिळाले नाही, काही निविदा निघालेलेच नाही. आपण आपल्या खर्चात वाढ करुन कचरा संकलनाचे काम सुरु करु म्हणजेच काय होईल. महानगरपालिकेच्या तिजोरीवर जास्त आर्थिक बोझा पडेल. त्या मधुन काहीच साध्य होणार नाही. स्वच्छ भारत अभियानाचे जे उद्दीष्ट आहे तेच साध्य होत नाही. मी तुम्हाला हया गोष्टी लक्षात आणुन देत आहे. उद्या तुम्ही गैरसमज करुन घेऊ नका की मी प्रशासनावर किंवा तुमच्यावर टिका करीत आहे. परंतु जर अशीच परिस्थिती असली तर किती दिवस लागतील ही निविदा अंतिम होई पावेतो.

श्री.सदाशिव ढेकळे :- जसा भाऊंनी सांगितले तर जो पर्यंत टेंडर होत नाही कचरा काय शहरात राहु द्यायचा का ? काल ही उचलला जायचा आज ही उचलला जात आहे. फक्त तुमचे म्हणणे काय आहे की विल्लेवाट लागली पाहिजे. पुर्वी जितके पैसे लागत होते महानगरपालिकेला तेव्हढेच या मक्तेदाराला ही लागत आहे. आपण काय जास्त पैसे देत आहो, की नुकसान होत आहे.

श्री.नितीन लढढा :- या मक्तेदाराला काम दिले तरच स्वच्छ भारत होईल असे नाहीये आज ही कचरा उचललाच जात आहे. मुख्य काम काय आहे की कचऱ्याची विल्हेवाट करण्याची आहे.

श्री.सदाशिव ढेकळे :- मा.सभापती महोदय लवकरात लवकर कसा या मक्त्याला प्रतिसाद मिळेल ते बघावे.

मा.सभापती :- उदय पाटील साहेब जे सभासद असतील किंवा प्रतिनिधी असतील त्यांना एकत्र घेवुन एक बैठक करून घ्यावी.

श्री.उदय पाटील :- सोमवारी बैठक घेवुन टाकु.

श्री.सुनिल खडके :- संबंधित अधिकाऱ्यांनी जे मक्तेदार असतील त्यांच्याशी चर्चा करून निर्णय घ्यावा.

श्री.नितीन लढढा :- आमची याबाबत सूचना ही आहे की कचरा संकलित करण्याच्या दृष्टीकोनातुन जळगांव शहराच्या विविध भागांमध्ये या कामासाठी शहरात आपण ४ प्रकल्प उभारणार आहोत , आणि त्यावर आव्हान्याच्या जागेवर तो प्रकल्प किंवा प्रोसेस सुरू त्याठिकाणी होईल. मला वाटते की या संपुर्ण प्रक्रीयेला ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागू शकतो, आणि ज्या पध्दतीने कचरा संकलन करणे सुरू आहे आणि हा कचरा संकलनाचा प्रकल्प संपुर्ण झाल्यानंतरच या मक्तेदाराला कार्यादेश देण्यात यावा जेणेकरून या महानगरपालिकेचा काहीतरी प्रमाणात पैसा वाचेल.

मा.सभापती :- आपण त्यातुन पर्याय काढु तसेच मा.आयुक्त साहेब यांच्या शी चर्चा करू तसेच भोळे साहेब प्रमुख जे सदस्य असतील त्यांना सोबत घेवुन आयुक्त साहेबांसोबत चर्चा करू.

श्री.सुनिल खडके :- सर्व सदस्यांना बोलावुन घ्यावे .

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय आपण आता निविदा प्रसिध्द करू त्याला प्रतिसाद मिळाला नाही तर पुन्हा प्रसिध्द करू निविदा प्रसिध्द झाल्यानंतर साधारण ४५ दिवसांची निविदा प्रक्रीया राहील, ४५ दिवसांनतर निविदेस प्रतिसाद मिळाल्यानंतर जे काही असेल तो पावेतो आचारसंहिता लागून जाईल पुन्हा दिड महिना आचार संहिता राहील

या निविदा प्रक्रीयेला जर प्रतिसाद मिळाला तर आपल्याला ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागेल परंतु कार्यादेश दिल्यानंतर कामाची जी मुदत असेल ६ महिने किंवा वर्ष भराची असेल किंवा जी त्या कामाच्या स्वरूपाच्या दृष्टीकोनाने म्हणजे कामाच्या भुमिकेबाबत साधारण १ वर्ष असेल आणि या १ वर्षाच्या कालावधीसाठी आज या माफक दरात चालत असलेली सेवा तीच्या व्यतीरिक्त जास्त खर्च का करावा हा एक महानगरपालिकेचा आर्थिक हेतू जोपासण्याची माझी सूचना आहे तशी माझी सुचना आपण नोंद करून घ्यावी आणि या सभागृहाला जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो आपण घेवू शकतात.

मा.सभापती :- नितीन भाऊंची सुचनेची नोंद घेण्यात यावी.

श्री.नितीन बरडे :- दैनंदिन कचरा संकलनाचा जो मक्ता आपण देतोय याच्या अटी व शर्ती आम्हाला माहिती नाहीत तरी त्या माहिती साठी देण्यात याव्यात .

मा.सभापती :- सभा आटोपल्यानंतर आपण त्याबाबत माहिती संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन माहिती घेवु शकतात

श्री.नितीन बरडे :- अटी व शर्ती मध्ये काय नमुद केलेले आहे ही माहिती पाहीजे कारण की दैनंदिन कचरा संकलन करणे असे म्हटलेले आहे, झाडु मारला गेला पाहीजे , रोज रस्त्यावरचा कचरा उचलला गेला पाहीजे त्याने सदर कचरा उचलला नाहीतर तर त्याचे प्रोव्हीजन काय आहे.

श्री.उदय पाटील :- आपण सविस्तर करारनामा तयार केलेला आहे , आज ही बैठक झाल्यानंतर आपण सदर मक्तेदाराला पत्र देणार संविदा करणेसाठी त्याकरीता जे डॉक्युमेंट आहेत ते मी आपल्याला देवु शकतो .

श्री.नितीन बरडे :- समजा त्याने एखादा रस्ता झाडलेला नाही तर त्याला त्यावर प्रोव्हीजन काय आहे ते पाहीजे.

श्री.उदय पाटील :- आपल्या करारनाम्यामध्ये अत्यंत सुक्ष्म प्रकारच्या भरपुर तरतुदी आहेत प्रत्येक गोष्टींचा अभ्यास केलेला आहे त्याची एक प्रत मी आपल्याला उपलब्ध करून देवु शकतो त्यामध्ये जवळपास ४५ च्या वर किंवा ४५ अटी , शर्ती त्यामध्ये नमुद केलेल्या आहेत.

श्री.नितीन बरडे :- ठिक आहे.

मा.उपायुक्त :- त्या निविदेच्या अटी व शर्तीची सर्व सदस्यांना एक प्रत देण्यात यावी.

मा.सभापती :- नगरसचिव साहेब पुढील विषय घेण्यात यावा.

श्री.नितीन लढढा :- सर्व विषय मान्य करून घ्या परंतु मला १० ते १५ मिनिटे वेळ द्या कारण माझ्या ज्या सुचना आहेत त्या मला मांडावयाच्या आहेत .

श्री.नितीन लढढा :- सर्वानुमते मान्य करण्याआधी आम्ही महानगपालिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या अनुषगांने बोलण्याची संधी देण्यात यावी .

मा.सभापती :- या विषयावर आपण चर्चा करू शकतात परंतु ५ वा विषय घेवु.

श्री.भगत बालाणी :- फक्त विषय क्रं.५ मध्ये त्यांची सुचना आहे तरी उर्वरित विषय त्यांना मंजुर आहेत तरी सर्वानुमते सर्व विषय मंजुर करावे , जोडपत्राचे विषय सुध्दा मंजुर आहेत . तरी सर्व विषय मंजुर करण्यात यावे.

श्री.नितीन लढढा :- विषय क्रं. ५ सोडुन सर्व विषय मंजुर आहेत .

नगरसचिव :- आदरणीय नितीन भाऊ, विषय क्र.५ सर्वानुमते मंजुर आहे का ?

श्री.नितीन लढढा :- आम्ही सुचना मांडलेली आहे.

नगरसचिव :- विषय क्र.५ सर्वानुमते मंजुर आहे का ?

श्री.नितीन लढढा :- विषय क्र.५ ला आमचा विरोध आहे.

नगरसचिव :- आदरणीय श्री.रियाज भाई, एम.आय.एम. विषय क्र.५ आपणास हा विषय मंजुर आहे का ?

श्री.रियाज बागवान :- विषय क्र.५ ला आमचा विरोध आहे.

मा.सभापती :- सदर बैठक संपल्यानंतर लगेच या सभागृहात रेन वॉटर हॉर्वेस्टिंग बाबतची बैठक आहे तरी आपण आपली बैठक १० मिनिटांत संपवु.

श्री.नितीन लढढा:- सदर बैठक १२ वाजेला आहे तरी मला १० मिनिटे चर्चा करू द्यावी आता एम.आय.डीसी मधील एका केमीकल कंपनीला आग लागली होती , आगीचे स्वरूप एतके भयानक होते की ज्या कंपनीला आग लागली होती ती संपुर्ण जळुन खाक झालेली आहे परंतु त्याच्या बाजुला असलेला बेहेडे ग्रुप यांचा उद्योग तो सुध्दा जळुन खाक झाला फायर फायटर ची जी परिस्थिती आहे त्या अनुषगांने त्यांना जितके प्रयत्न शक्य होते तेवढे त्यांनी केले तरी या अनुषगांने सभापती महोदय जे अद्यावत आहेत याच्यामध्ये फोर्मस आहेत कारण केमीकल फॅक्टरीला आग लागल्यानंतर पर्यायाने ती आग पाण्याने विझत नसते आणि ती फोर्मस च्या साहाय्याने विझत असते परंतु दुख : या गोष्टीचे आहे की जळगांव शहर महानगरपालिकेला ४ फायर फायटरच्या चेसीस जवळपास १ वर्षापुर्वी खरेदी करून बॉडी बिल्डींग साठी पडलेल्या आहेत आज जळगांव शहर मनपाच्या अग्निशमन विभागाची परिस्थिती ईतकी दयनीय आहे की उद्या जर एखादी दुर्घटना झाली तर मी म्हणतो मोठा अनर्थ घडु शकतो या घटनेसुध्दा मोठा अनर्थ घडण्यासारखीच परिस्थिती होती परंतु आजुबाजुच्या उपलब्ध व्यवस्थेच्या अनुषगांने ही आग आटोक्यात आणण्यात आली. सभापती महोदय आपल्याकडे

महाबळ , एम.आय.डी.सी चे फायर स्टेशन , गोलाणी मार्केट , शिवाजी नगरचे फायर स्टेशन आहेत . परंतु या फायर स्टेशन ला वाहने उभी केल्यानंतर स्टँडबाय वाहन व्यवस्था सुध्दा नाही .

मा.सभापती :- तुम्ही असे काही सांगा की आम्ही परत सांत राहू साधारण दोन महिने महिने झाले आहेत काय प्रकार सुरू आहे म्हणजे जिवनाशी खेळ खेळायचा आहे ना सगळयांना

श्री.एस.एस.पाटील :- मिनि फायटर चा जो विषय आहे त्याची निविदा प्रक्रीया सुरू आहे.

मा.सभापती :- हे आम्ही कधी पासुनच ऐकतो आहे.

श्री.एस.एस.पाटील :- याबाबतची जी प्रक्रीया आहे ती अंतिम टप्प्यात आहे त्याबाबत आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव पाठविलेला आहे मंजुरी मिळाल्यानंतर दर मागविणेबाबतची प्रक्रीया होईल .

मा.उपायुक्त :- किती वेळेत काम होईल ते सांगा .

श्री.एस.एस.पाटील :- प्रत्यक्षात ज्या काही निविदा प्रसिध्द झालेल्या आहेत त्या मध्ये अग्निसुरक्षा निधीचा एक प्रस्ताव होता त्यानंतर त्यांचे दर मनपा फंडामध्ये असुन त्यांचे दरास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे तसेच त्या प्रकरणाचा मी जो अभ्यास केलेला आहे यापुर्वी सदर मक्तेदार जे आहेत त्यांनी वाटाघाटी केलेली आहे वाटाघाटी अंती सदर मक्तेदाराने १ टक्का दर कमी करून दिलेला आहे परंतु त्यानंतर बाजार भाव तपासण्यात आले सदर भाव कमी झाल्यानंतर ही प्रक्रीया परत लांबलेली आहे.

मा.सभापती :- तरी कधी पर्यंत होईल .

श्री.एस.एस.पाटील :- मक्तेदाराला आपण पत्र दिलेले आहे त्यात आपण त्याला ७ दिवसांची मुदत दिलेली आहे त्यामध्ये ५० लाख रू. मध्ये मिनि फायटर ची बांधणी करून देणार आहेत किंवा कसे याबाबत आपण पत्र दिलेले आहे . उर्वरित तीन फायर फायटर चा जो प्रस्ताव आहे त्यांच्याही निविदा प्रक्रीया झालेल्या आहेत त्या निविदा प्रक्रीया मधील महासभेत एक प्रस्ताव होता प्रशासकीय दर त्यावेळेला जास्त होते त्यानुसार बाजार भावानुसार जी अंदाजित रक्कम होती ती सदर विभागाकडुन आलेली होती आणि त्यानंतर दर आले , त्यानंतर अहमदाबाद येथील जी एजन्सी आहे त्यांनी जे दर दिलेले आहे ४५ लाख रू . त्याच्याशी त्याचे कंपेरिजन केले गेलेले आहे त्यानंतर आज १७ लाख रू ची किंमत ही जास्त आहे जी १७ लाख रू ची रक्कम जी जास्तीची आहे त्यावर प्रक्रीया सुरू आहे . उर्वरित ज्या ३ चेसीस आहेत त्याकरीता आपल्याला डिपीडीसी मधुन एकत्रित खर्च करणे बाबत आपण जिल्हा नियोजन समितीला वर्ग करून मिळणेबाबत पत्र दिलेले आहे

श्री.नितीन लढढा :- उर्वरित निधी

श्री.एस.एस.पाटील :- उर्वरित निधी हा आपल्याला त्यावेळेला जो निर्णय झालेला होता मनपाच्या मार्केट मधुन येणाऱ्या निधीमधुन आपण खर्च करणार होतो.

श्री.नितीन लढढा :- गाळेधारकांकडुन जमा झालेला निधी शिल्लक आहे का ? खरी वस्तुस्थिती ही आहे की, साधारणता आपले तत्कालीन आयुक्त असतांना २२ कोटी रुपये भाडे म्हणुन गाळेधारकांकडुन जमा केलेली होती. त्यावेळेस दोन धोरणात्मक निर्णय झाले होते. एक फायर फाईटर बांधणीसाठी वापरता येईल आणि दुसरा JDCC बँकेकडुन घेतलेला कर्ज पोटी वन टाईम सेटलमेंट करीता ती रक्कम भरणा केल्यास एक अकाऊंट तरी कमी होईल. प्रशासनाने अश्या प्रकारचे धोरणात्मक निर्णयांची पायमल्ली करणे म्हणजे या संपुर्ण सभागृहाचा अवमान आहे. आणि त्या धोरणात्मक निर्णयाला अर्थ का नाही ? तुम्ही या सभेत याल, चर्चा कराल, धोरणात्मक निर्णय घ्याल आणि तुम्ही या निर्णयांचा अश्याच पध्दतीने जर पायमल्ली होत असेल तर मला वाटते की लोकशाही जिवंत राहणार नाही. हुकुमशाही चालेल. आता जे दर जास्त आलेले आहे याचे ही कारण हेच. हा जो मनपा निधी आहे केव्हा मिळेल, मिळेल की नाही याची कुठली ही शाश्वती नसल्याकारणाने मक्तेदाराने या सर्व गोष्टींचा व पध्दतीचा विचार करुन या पध्दतीचे दर निविदेत भरले असावे हा माझा एक प्राथमिक विचार आहे. मनपाची तिजोरी भरण्याचा कोणीही प्रयत्नच करत नाही . पगाराचा उपसा चालेल, गटारींवर खर्च चालेल याला भरणे कामी कोणत्याही योजना योजले जात असतील याची आकडेवारी मी तुम्हाला सांगतो

| **वर्णन** | **दि.३१/०३/२०१९ पर्यंत थकबाकी** | **दि.०४/०७/२०१९ पर्यंत वसुल** |
|---|---|---|
| **प्रभाग समिती क्र.०१** | **रु.६,३०,३२,३२१/-** | **रु.३८,०६,१०७/-** |
| **प्रभाग समिती क्र.०२** | **रु.६,६०,८१,५९८/-** | **रु.३२,३०,७५३/-** |
| **प्रभाग समिती क्र.०३** | **रु.१४,९५,६२,९३०/-** | **रु.४२,५३,८३९/-** |
| **प्रभाग समिती क्र.०४** | **रु.४,२३,१६,६६५/-** | **रु.३६,५१,४२६/-** |

**अंदाजे जुनी थकबाकी ३० कोटी च्या जवळपास**

**घरकुल विभाग दि.३१/०३/२०१९ अखेर रु. २,९५,८१,००३३५/-**

**सन २०१९-२० ची मागणी रु. ३९,८६,३२०२४/-**

**घरकुल विभाग**
**सन २०१९-२० ची मागणी रु. १५,१४,८०,७००/-**

**खुला भुखंड कर**
**सन २०१९-२० ची मागणी रु. ३८,८२,०७,५१२/-**

म्हणजेच या नगरपालिकेला तब्बल ४५० कोटीचे येणे बाकी निव्वळ मनपा फंडात पैसा नाही म्हणुन या निविदांना प्रतिसाद मिळत नाही. या ४५० कोटी मधुन साधारणता ३३५ कोटी ही जी रक्कम आहे. ती गाळेधारकांची सन २०१२ पासुन बाकी आहे. सन २०१२ ते २०१९ तब्बल ८ वर्षाचा प्रवास झालेला आहे. आणि ही रक्कम गाळेधारकांकडून वसुल करणे बाकी आहे. या बाबत दि.१४/०७/२०१७ रोजी मे.न्यायालयाने निवाडा दिलेला आहे औरंगाबाद हायकोर्ट ने. तद्नंतर सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल झाले ते अपिल दि.०४/१२/२०१७ रोजी म्हणजे सुप्रिम कोर्टाचा निवाडा होऊन तब्बल दोन वर्ष झालेले आहे. मला या सर्व परिस्थिती मधुन असे वाटते. जळगांव शहर महानगरपालिकेला उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापेक्षा ही मोठा दर्जा मिळालेला आहे का ? जी महानगरपालिका देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा विचार करत नाही. ही परिस्थिती आज जळगांव महानगरपालिकेची आहे. अतिस्पष्ट आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम १५२ स्पष्टपणे म्हणतो वसुल न होण्या जोगी कर निर्लेखित करणे, आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणत्याही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल कोणतीही रक्कमेत जी रक्कम वसुल होण्याजोगी नसेल तर ती निर्लेखित करता येईल. महानगरपालिका दुखी आहे , महानगरपालिकेकडे पैसे नाहीत म्हणून जनता दुखी आहे म्हणजे हे सर्व सामान्यांना दुखी करण्याचे तंत्रज्ञान आहे हे तंत्रज्ञान खुप अद्यावत आहे.

मा.सभापती :- याबाबत सविस्तर अहवाल सोमवारी आपण बैठक घेवु त्यावेळी अहवाल सादर करावा.

श्री.नितीन लढढा:- मा.सभापती महोदय मी जी आकडेवारी दिलेली आहे ती सर्व प्रशासनाकडुन प्राप्त करून दिली आहे यामध्ये दोनच निर्णय आहेत , एक तर ती रक्कम निर्लेखित करावी किंवा ती वसुल करण्याच्या संदर्भात प्रशासनाने कसोशीने प्रयत्न करावे या शिवाय याला काहीच मार्ग नाहीये सभापती महोदय या चर्चेमध्ये ८ वर्ष गेली आहेत आपण किती काळापर्यंत राज्य शासनाकडील योजनांवर अबलंबुन राहणार आपण किती दिवस भिक मागणार आहोत ज्या दिवशी मालकाने भिक देणे बंद केले त्यादिवशी परिस्थिती अशी होईल की तो पावेतो त्याचे डोके दुसरी कडे जातील आणि त्याची बदली दुसरीकडे होईल आणि त्याला ती सवय पडुन गेलेली असेल की भिक मागायची आणि त्यावर उदरनिर्वाह चालवायचा तशी परिस्थिती आपण आपल्या हाताने करतोय .

मा.सभापती :- याबाबत सविस्तर अहवाल पाहील्यानंतर काय आहे ते मी काही तरी निर्णय घेता येईल

श्री.नितीन लढढा:- मा.सभापती महोदय मी आपणांस विनंती करतो की पुढील स्थायी समिती बैठकीसमोर याच्या संदर्भातील सक्त वसुलीचे निर्देश देणे अपेक्षित अन्यथा सेक्शन १५२ खाली हया रक्कमा निर्लेखित करण्या संदर्भातील प्रस्ताव सभेसमोर यावा . कमीत कमी सुखाचा श्वास घेता येईल . आणि आम्हालाही या सभेमध्ये चर्चा करता करता साधारण ७ वर्षाचा कालावधी गेला आहे.परंतु प्रत्येक वेळी न्यायालयीन प्रक्रीया करता करता जवळ पास ही प्रक्रीया अंतिम टप्प्यात चालली गेली आहे .

मा.सभापती :- भाऊ ७ नाही ८-९ वर्ष तुमच्याच ताब्यात होते हे सगळे आणि आत्ता साधारण १ वर्ष होत आहे आम्हाला तुम्ही ७ वर्ष अभ्यास केला आहे आम्हालाही काही वेळ लागेलच ना .

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय तुम्ही महापालिका क्षेत्रात पहिल्यांदा आले आहेत यापुर्वी तुमच्या सोबतची मंडळी ही आमच्या सोबत होती या संदर्भात मला खोलात जाऊन चर्चा करण्याची ईच्छा नाहीये परंतु मी महापालिकेच्या आर्थिक बाबींच्या विषयी बोलतोय की कुठेतरी आपल्याला काही ठोस निर्णय घ्यावे लागतील आपला सभापती पदाचा कार्यकाळ संपण्यापुर्वी असे काही काम व्हावेत जेणेकरून तुमच्या सभापती पदाचा कार्यकाळ हा कौतुकास्पद व्हावा लोकांच्या विस्मृती मध्ये न जाता त्याच्या स्मृती मध्ये राहावा अशी आमची ईच्छा आहे .

श्री.चेतन सनकत :- जळगांव शहरातील सर्व सुलभ शौचालयावर पाणी पोहोचत नसल्यामुळे साफसफाई होत नाहीये त्यामुळे तेथे साफसफाई झालेली आहे. टँकरची माहिती द्या.

मा.सभापती :- पाटील साहेब पाण्याचे टँकर सुरू आहेत का ?

आरोग्यधिकारी :- आपले पाण्याचे टँकर बंद आहे आणि फायरफाईटरचा टँकर आपण घेतलेला आहे. ते टँकर बंद असल्यामुळे पाण्याची अडचण निर्माण झाली होती. आता आपण दोन टँकर खरेदी केलेले आहे. ते आलेले आहे आपल्या आवारात त्यांची पासींग, इन्शयुरन्स आणि नंबर राहिलेली आहे.

श्री.चेतन सनकत :- पाटील साहेब माझ्या माहिती प्रमाणे त्याची पासींग झालेली आहे. वाहन विभागाला विचारा.

श्री.एस.एस.पाटील :- पासींग झालेली आहे.

मा.उपायुक्त :- मग कशासाठी थांबलेले आहे काम ?

श्री.चेतन सनकत :- एकीकडे पासींग झालेली वाहने उपलब्ध असलेली वाहने उभी आहे. यांचे दुर्लक्ष काय आहे समजुन घ्या. ते स्वत: म्हणत आहेत की वाहनांची पासांग झालेली आहे वाहने उभी आहे आणि १० दिवसापासुन तेथे पाणी पुरवत नाही.

मा.सभापती :- आता काय करायचे पाटील साहेब

श्री.एस.एस.पाटील :- पासींगची जी प्रोसेस आहे मागच्या आठवडयामध्ये पुर्ण करुन दिलेली आहे. आरोग्य विभागाची अडचण आहे की या टँकरला पंप नाही.

मा.सभापती :- त्याकरीता काय करावे लागेल

श्री.एस.एस.पाटील :- त्या वाहनांना नविन पंप बसवावे लागतील.

मा.उपायुक्त :- हा विषय कुठल्या विभागाशी संबंधीत आहे वाहन विभाग की आरोग्य विभाग, कोण बसविणार आहे पंप ?

श्री.नितीन बरडे :- आपल्या कडे उपलब्ध असलेले पंप बसविण्यात यावे .

श्री.उदय पाटील :- आपण ज्यावेळेला वाहनां करीताची बीड टाकलेली होती त्यावेळी एकच निविदा आली , दुसरी व तिसरी टाकली त्यावेळीही एकच निविदा आली तसेच चौथ्यांदा टाकल्यानंतर या मक्तेदाराशिवाय आपल्याकडे पर्याय नव्हता . या निविदेमध्ये आपण तसे घेतलेले आहे आता अडचण वाहन विभागाची आहे की पासिंग झाल्यावर सुध्दा वाहनांवर नंबर टाकण्यात आलेली नाहीत .

मा.सभापती :- पाटील साहेब पासिंग झालेली आहे पण नंबर टाकण्यात आलेले नाहीत का ?

श्री.उदय पाटील :- जी वाहने आपण घेतलेली आहे त्यांना आपण पंपाच्या साहाय्याने प्रेशर ने पाणी पुरवावे लागते . त्याबाबतचा प्रस्ताव वाहन विभागाकडुन तयार करून ते पंप बसवुन घ्यावे लागतील . तशी मी पाटील साहेबांशी आठ दिवसांपुर्वीच चर्चा केलेली आहे.

श्री.चेतन सनकत:- आचार संहिता लागण्या अगोदर हे काम पुर्ण करावे .

श्री.एस.एस.पाटील :- जी वाहने पासिंग झालेली आहे .

मा.सभापती :- आपण चॉईस नंबर घेणेसाठी थांबलेले आहेत का ?

श्री.एस.एस.पाटील :- नाही

मा.सभापती :- सदर काम लवकरात लवकर मार्गी लावा.

श्री.उदय पाटील :- आपल्या २५ घंटागाडया परवा पासिंग झाल्या आहेत.मी श्री. .एस.एस.पाटील यांच्यावर आरोप करीत नाहीये परंतु मी यांना तसेच नेहते तसेच मिलींद चौधरी यांनाही ८ दिवसांपुर्वीच सांगीतले की आपण नवीन वाहने खरेदी केलेली आहेत त्या येथे आलेल्या आहेत परंतु यांनी सदर वाहने ताब्यात घेतल्या नाहीत व सदर वाहने परत गेली होती मी हे सांगीतले , मी टँकर साठी कोणते पंप लागतील त्याचा प्रस्ताव तयार करा असे यांना सांगीतले होते .

मा.सभापती :- नेहते साहेब तुमच्या कडे माणसे नाहीत का काम करायला .

श्री.नितीन बरडे :- महासभेत विषय झालेल्या वाहनांच्या चेसीस चांगल्या कंडीशन मध्ये आहेत का ? की तशाच उभ्या आहेत.

मा.सभापती :- सदर काम लवकरात लवकर करा.

मा.उपायुक्त :- पंपाचे काम लवकरात लवकर करा.

श्री.चेतन सनकत :- वाहनांना पंप बसतील तेव्हा बसतील पण आज रोजी शौचालयांची साफसफाई होत नाही त्याचे काय करायचे ते सांगा .जेणेकरून त्या ठिकाणी साफसफाई होईल.

मा.सभापती :- उदय पाटील साहेब आत्ता सध्दयापुरती काय व्यवस्था करता येईल .

श्री.उदय पाटील :- टँकर बंद असल्यामुळे आपण संपुर्ण शहराला पाणी पुरवठा करू शकत नाही.

मा.सभापती :- .एस.एस.पाटील साहेब बंद टँकरचे अडचण काय आहे ?

श्री .एस.एस.पाटील:- माझ्या माहिती नुसार जे आहे टँकर बंद चा रिपोर्ट माझ्याकडे आलेला नाही , माझ्याकडे आरोग्य विभागाचा डेली रिपोर्ट जो आहे तो आत्ता माझ्या कडे दि.०६/०७/२०१९ चा आहे या मध्ये जी वाहने बंद आहेत त्याची यादी आहे .

श्री.नितीन बरडे :- काही किरकोळ कामे असतील तर लवकर करून द्या.

मा.सभापती :- दोघेही बसुन त्यावर काय पर्यायी व्यवस्था असेल ती ठरवा व सर्व कामे लवकर करा. तसेच अग्निशमन विभाग बारी साहेब आपण प्रायव्हेट कोचींग क्लासेस , कॉलेजेस ला आपण फायर सेफटी संदर्भात त्यांची तपासणी करतो का ?

अग्निशमन अधिकारी :- आपण मागच्या आठवडयात त्यांना नोटीशी दिल्या आहेत सर्व प्रायव्हेट कोचींग क्लासेस , कॉलेजेस ला दिल्या आहेत. आता ते लोकं आपल्या कडे येत आहेत . त्यामध्ये प्रायव्हेट कोचींग क्लासेस चालक भाडेकरू च आहेत त्यामुळे वाद सुरू आहेत.

मा.सभापती :- मग त्यावर काही अटी शर्ती असतील ना ?

अग्निशमन अधिकारी :- हो आहेत विभागाकडुन त्यांना सुचित करण्यात आलेले आहे त्या शिवाय आपण त्यांना नाहरकत परवाना देत नाही.

मा.सभापती :- सोमवारी सर्व अहवाल मला सादर करा.

अग्निशमन अधिकारी :- होय .

मा.सभापती :- सर्व सदस्यांना एक विनंती आहे या सभागृहात पुढील चर्चा सत्राची वेळ होत आहे तरी आपण ५ मिनिटांत बैठक संपवु .

श्री.रियाज बागवान :- मा.सभापती महोदय मेहरूण परिसरात मुलतानी हॉस्पीटल आहे . डॉ.साहेब तेथील ओपीडी किती आहे .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- ६० ते ७० मी ॲव्हरेज सांगीतले आपल्याला सुटटया वगळुन आहेत ही माहिती .

श्री.रियाज बागवान :- आपल्याला यापुर्वी एक पत्र दिलेले आहे त्याचे काय झाले त्याची माहिती द्यावी.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- माझ्या अंडर मध्ये असेल तर मी काही सामान लागत असेल तर ते लगेच पुरवितो आणि जर दुसऱ्या विभागाशी संबंधित असेल तर ते पत्र संबंधित विभागाकडे पुरविणे कामी पाठविले जाते , जसे भांडार विभाग , बांधकाम विभाग यांना मी सदरचे प्राप्त पत्र मागणी नुसार पुर्तता करणेसाठी पाठवित असतो .

मा.सभापती :- बैठक संपल्यानंतर त्यांच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविणेबाबत त्यांना भेटुन सांगा .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- होय साहेब .

श्री.सुनिल खडके :- आपण कर्मचाऱ्या मार्फत साफसफाई करत असतो परंतु गटारीवरील पाईप मधील जो कचरा असतो तो काढण्यासाठी काही प्रोव्हिजन आहे की ? आपल्याकडे एक वाहन होते ते सुरू आहे का ?

श्री.विकास पाटील :- ते बंद पडलेले आहे .

श्री.सुनिल खडके :- किती दिवसांपासुन बंद पडलेले आहे ?

श्री.विकास पाटील :- साधारण एक वर्षापासुन बंद आहे .

श्री.सुनिल खडके :- नविन घेण्यासाठी काही प्रोव्हिजन आहे का ?

श्री.विकास पाटील :- घ्यायची आहे एक नविन

श्री.सुनिल खडके :- त्या बाबतीत आम्ही नगरसेवकांनी पत्र दिलेले आहे .

मा.उपायुक्त :- कशा पध्दतीने घ्यावयाचे आहे ते सांगा. यासाठी काही निविदाची प्रोसीजर केली आहे का ते सांगा

श्री.सुनिल खडके :- आपण तशी मागणी केलेली आहे का ?

श्री.विकास पाटील :- हो तशी मागणी करण्यात आलेली आहे .

श्री.सुनिल खडके :- काय होते की दुसऱ्या दिवशी तीच परिस्थिती होते कचरा जो असतो , आपल्या कर्मचाऱ्याकडे जो लहान पावडा असतो त्याने काही पुर्ण कचरा निघत नाही त्याबाबतीत आपण काही केलेले आहे का ?

श्री.विकास पाटील :- आपल्याला कचरा काढणेसाठी खरेदी करावयाची आहे .

श्री.सुनिल खडके :- लवकरात लवकर करा व तसा पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

श्री.प्रविण कोल्हे :- आसोदा रोड वर फार मोठया प्रमाणात खडडे झालेले आहेत काल त्या ठिकाणी स्कुल बस अडकली होती . त्या भागातील नागरीकांनी अर्जसुध्दा दिलेले आहेत.

मा.सभापती :- श्री.भोळे साहेब त्या ठिकाणी काही करता येईल का . काही मुरूम वगैरे टाकता येईल तर लवकर टाकायला सांगा

श्री.सुनिल भोळे :- संबंधित अभियंत्यांना सांगीतले आहे की सदर भागाकरीता चे ईस्टेमेट तयार करून पाठवा व ते प्राप्त झाल्यानंतर मंजुर करून घेवु .

मा.सभापती :- ठिक आहे.

श्री.नितीन लढढा :- ज्या पध्दतीने हयांचे ईस्टिमेट तयार करत आहात तसेच शाहु नगरच्या रस्त्याचे सुध्दा तयार करावे कारण शिवाजी नगरचा पुल बंद झाल्यामुळे बंजरंग बोगद्याकडुन मोठया प्रमाणात वाहतुक ही शाहु नगर कडुन येत असते त्या शाहु नगरची परिस्थिती ईतकी दयनीय आहे म्हणजे सर्व बाबतीत जसे आरोग्य , रस्ते , लाईट च्या बाबतीत अगदी दयनीय झालेली आहे , रस्त्यावर मोठमोठे दगड पडलेले आहेत , रस्ता दोन्ही बाजुने अतिक्रमण मुळे लहान झालेला आहे त्याठिकाणी संमीश्र वस्ती आहे जर समजा उद्या वाहन चालकाचा धक्का लहान मुलाला लागला त्यावरून त्या ठिकाणी जातीय तणाव होवु शकतो अशी परिस्थिती त्या ठिकाणी आहे . सभापती महोदय आपण त्या रस्त्यावर जा आपल्यालाही त्या ठिकाणी किव येईल की आपण या शहरात राहतोय .

मा.सभापती :- भोळे साहेब शाहु नगर च्या बाबतीत काय करता येईल ते पाहावे.

श्री.नितीन लढढा :- माझा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे मी फक्त दोनच मिनिटे घेतो , भोईटे नगर पासुन ते पिंप्राळा पर्यंतचा रस्त्याची कागदावर त्याची रुंदी आहे १८ मीटर रस्त्याची परिस्थिती आज प्रत्यक्षात जाऊन मोजली तर ती कमी आहे , रेल्वे विभागाने आता त्यांच्या हद्यीतील बांधकाम सुरू केलेले आहे येत्या काही दिवसांमध्ये रेल्वे गेट पर्यंत कंपाऊंड वॉल बांधली जाईल त्या रस्त्याची रुंदी काही काही ठिकाणी ६ मीटर , ८ मीटर कुठे ९ मीटर आहे कागदवर १८ मीटर चा रस्ता आहे ६ ते १० मीटरच्या वर तो रस्ता नाही संपुर्ण रस्ता हा अडवलेला आहे , त्याचे परिणाम सांगतो की ज्यावेळी चंद्रकांत दादा पाटील पालकमंत्री होते व मी महापौर होतो त्यावेळी सदर गेटवर उडडाणपुला संदर्भात कल्पना दिलेली होती परंतु मध्यंतरी ही जी माहिती घेतली की त्या ठिकाणी रस्ता पुर्ण भरत नसल्या कारणाने हे काम करण्याच्या संदर्भातील जो विचार सुरू आहे तो सरळ रिंगरोडपासुन ते रेल्वे लाईनपासुन शिवाजी नगर कडे त्याच्या मध्ये एक वळण रस्ता पिंप्राळा रोडकडे वळवणार होतो परंतु १८ मीटरचा रस्ता जागेवर दिसत नसल्याकारणाने ती आर्म कमी करण्यासंदर्भातच्या सुविधा त्यामध्ये दिलेल्या आहेत म्हणजे रिंगरोड वरून भोईटे गेटवरून एक रस्ता पिंप्राळयाकडे जाईल आणि दुसरा मार्ग शिवाजी नगरकडे जाईल त्याची एक बाहु कापण्याच्या संदर्भातील प्रस्ताव सुचविण्यात आलेला आहे म्हणुन तातडीने त्या रस्त्याचे मोजमाप करून तो रस्ता शोधुन त्याचे रिमार्केबल करून आणि तो ताब्यात घेवुन तसेच उडडाण पुला संदर्भात काम करणे अत्यंत गरजेचे आहे.

मा.उपायुक्त :- टाऊन प्लॅनिंग विभागास सुचित करण्यात येईल.

श्री.नितीन लढढा :- भोळे साहेब रस्त्याची परिस्थिती काय आहे ? अस्तीत्वात किती रस्ता आहे?

श्री.सुनिल भोळे :- अस्तीत्वात यश लॉन पासुन ते भोईटे नगर जवळपास ५ ते ६ मीटर उरणार आहे कारण रेल्वे विभागाने संपुर्ण बांधकाम सुरू केले आहे कारण रेल्वेचे ३ ऱ्या रेल्वे लाईनचे काम सुरू झालेले आहे. या संदर्भात टाऊन प्लॅनिंग विभागा वाल्यांना सोबत घेवुन गेलेलो होतो त्यांनी ते मोजमाप घेतले होते त्यांना प्रत्येकाचे घर मोजावे लागेल व त्यानुसार कोणत्या घराचे किती अतिक्रमण आहे ते पाहावे लागेल त्यानंतर ते अतिक्रमण काढावे लागेल व त्यानंतर तो रस्ता ताब्यात घ्यावा लागेल हा एकच पर्याय आहे तसे आम्ही टाऊन प्लॅनिंग विभागास कळविलेले आहे .परवा या संदर्भात मा.आयुक्त सो यांचे सोबतही चर्चा झाली आहे कारण हा गंभीर विषय आहे कारण पुल जर मंजुर झाला आणि जर तो आर्म आला नाही त्या ड्राईंग मध्ये तर त्या परिसरातील लोकांना येण्याजाण्याचा मार्ग कायम स्वरूपी बंद होईल .

श्री.नितीन लढढा :- येणार नाही तो आर्म कारण प्रस्तावित केलेला नाही एक हाताने अपंग असल्यासारखी परिस्थिती उडडाण पुलाची होईल हा विषय गंभीर आहे .

मा.सभापती :- आपण मा.आयुक्त सो यांच्या सोबत या विषयावर चर्चा करू

श्री.नितीन लढढा :- आपण नगररचना विभागाला निर्देश द्या की तातडीने त्यांनी त्या रस्त्याची मोजणी करावी व रस्ता ताब्यात घ्यावा .

मा.सभापती :- चालेल ठिक आहे .

श्री.नितीन लढढा :- कारण काय आहे या गोष्टी अनंत काळापासुन सुरू आहेत.

मा.सभापती :- मी भोळे साहेबांना सांगीतले आहेच .

श्री.नितीन लढढा :- भोळे साहेबांना सांगुन उपयोग नाही .

मा.सभापती :- ठिक आहे टाऊन प्लॅनिंग वाल्यांना सांगतो .

श्री.नितीन लढढा :- तुम्ही त्यांना विचारा की हा विषय किती दिवसापासुन सुरू आहे .

मा.सभापती :- कोण आलेले आहे नगररचना विभागाकडुन .

श्री.सुहास चौधरी :- सदर रस्त्याची मोजणी करण्यात आलेली आहे , परंतु प्रत्येक प्लॉटवरील बांधकाम व त्याचे लेआऊट यांची जुळवणी सुरू आहे ती पुर्ण झाल्यानंतर प्रत्येकाचा प्लॉट मोजला जाईल त्यानंतर रस्ता आखला जाईल .

मा.सभापती :- हे काम कधी पर्यंत होईल ?

श्री.सुहास चौधरी :- साधारण १५ दिवसामध्ये होईल .

मा.सभापती :- ठिक आहे १५ दिवसांत करा व पुढील कार्यवाही माझ्यावर सोडा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 नुसार 5 वर्षे कालावधीकरीता शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा, इ.स्त्यावरील कचरा घंटागाडीद्वारे संकलन व वाहतूक करणे व शहरातील दैनंदिन रस्ते, गटार इ. साफसफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणेकामी अंदाजीत रक्कम रु.71.48 कोटी येणारा खर्च 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून (मुदत दि.31/03/2020 संपुष्टात येईपावेतो) तद्नंतर भविष्यात या कामी निधीची तरतूद 15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त रक्कमेतून चिन्हांकित करणेस तसेच L1 मक्तेदार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांचेशी अटी शर्तीचा करारनामा करुन कार्यादेश देणेस मा. महासभा ठराव क्रं.149 दि.06/06/2019 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| कामाचे नांव | दर | प्रतीमहा खर्च | प्रती वर्ष खर्च | 5 वर्ष कालावधीचा खर्च |
|---|---|---|---|---|
| **अ)** घराघरातून निघणारा ओला व सुका विलगीकृत घनकचरा संकलन व वाहतूक करणे. (220 मे. टन प्रती दिन) | रु.949.50/- प्रती टन | रु.62.67 लक्ष | रु.7.52 कोटी | रु.37.60 कोटी |
| **ब)** शहरातील दैनंदिन रस्ते व गटारी साफ सफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणे. (रु.489/- + रु.54/- = रु.543/- प्रती कामगार प्रतिदिन) | रु.543/- प्रती कामगार प्रती दिन | रु.56.47 लक्ष | रु.6.77 कोटी | रु.33.88 कोटी |
| **एकूण-** | | **रु.1.19 कोटी** | **रु.14.30 कोटी** | **रु.71.48 कोटी** |

1. म.न.पा. सार्वत्रिक निवडणूक सन-2018 वार्ड रचनेनुसार शहरातील 19 (अ/ब/क/ड) वार्डातील 100% दैनंदिन साफ सफाईचे उद्दिष्ट असून शास्त्रोक्त पध्दतीने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 नुसार प्रस्तावीत निविदेतील अटी शर्तीनुसार अंमलबजावणी करणे कामी 5 वर्ष कालावधीकरीता येणारा खर्च अ) रु.37.60 कोटी + ब) रु.33.88 कोटी असा एकूण रक्कम **रु.71.48 कोटी** अपेक्षीत खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

2. अ) शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत घनकचरा संकलन व वाहतूक करीता मक्तेदार यांचे प्राप्त झालेले टिपींग फी दर रक्कम रु.949.50/- प्रती टन तसेच ब) शहरातील दैनंदिन रस्ते, गटारी साफ सफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणे कामी मक्तेदार यांना म.न.पा.तर्फे दयावयाचे किमान वेतन दर रु.489/- प्रती कामगार प्रती दिन या दरावर निविदाकाराचे प्राप्त सेवाशुल्क निविदा दर रु.54/- असे एकूण रु.543/- प्रती कामगार प्रती दिन मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

3. निविदेतील अटी शर्तीनुसार एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून 5 % नैसर्गिक वाढ विचारात घेवून मक्तेदार यांचे प्राप्त दरातील रक्कमेवर कामगारांचे वेतन वगळून उर्वरित रक्कमेवर 5% दरवाढ दरवर्षी महापालिकेतर्फे देणे क्रमप्राप्त असल्याने त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

4. निविदेतील अटी शर्ती नुसार शासनाच्या किमान वेतन अधिनियम 1948 प्रमाणे कामगारांचे किमान वेतन दरात वेळोवेळी होणारे बदल मक्तेदार यांना अनुज्ञेय असून त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

5. मक्तेदार यांचेमार्फत निविदेतील मंजूर दरात प्रसंगी आवश्यकता भासल्यास साफ सफाई करीता वेळोवेळी अतिरिक्त कामगार पुरवठा करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

6. 5 वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून दि.31/03/2020 पावेतो मुदत संपुष्टात येईपावेतो तसेच भविष्यात या कामी निधींची तरतूद 15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून चिन्हांकित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तावीत केलेनुसार अ.क्र. 1 ते 6 बाबींकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 संविदा 73 (क) नुसार मक्तेदार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांचेशी म.न.पा. विधीतज्ञ यांनी प्रमाणित केलेल्या मसुदयानुसार अटी शर्तीसह संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने शासन परिपत्रक / शासन निर्देश व अधिनियमातील तरतूदीनुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ०४**

**सुचक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- श्री. खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ६**) महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०२ मध्ये आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व ४ ठिकाणी बोअरवेल करणे व प्रभाग क्र.०२ मधील कांचननगर, कालंकामाता मंदिराजवळील मनपाची आरक्षित जागा विकसीत करणे व वॉचमन रुम बांधणे कामी मक्तेदार प्रवीण काशिनाथ राणे यांचे निविदा रक्कमेवर ७.६५% कमीचे दरानुसार रक्कम रु.३०,२४,३११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 5 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.02 मध्ये आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व 4 ठिकाणी बोअरवेल करणे व प्रभाग क्र.02 मधील कांचननगर,कालंकामाता मंदिराजवळील मनपाची आरक्षित जागा विकसीत करणे व वॉचमन रुम बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 59 दि. 07/12/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2018/प्र.क्रं. 170 अ (27)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 28/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.3274836/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | स्वामी कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर 2% जास्तीचे दराने | 3340333/- |
| 2 | **प्रवीण काशिनाथ राणे** | **निविदा रक्कमेपेक्षा 7.65% कमीचे दराने** | 3024311/- |
| 3 | श्री गजानन एन्टरप्राईजेस<br>प्रो.पा.भाग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेवर 5% जास्तीचे दराने | 3438578/- |
| 4 | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर 1% जास्तीचे दराने | 3307584/- |
| 5 | कासट स्टोन<br>प्रो.पा.शरद शिवनारायण कासट | निविदा रक्कमेवर 8% जास्तीचे दराने | 3536823/- |
| 6 | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन<br>प्रो.पा. विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेपेक्षा 0.999% कमीचे दराने | 3242120/- |

मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 7.65% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार श्री प्रवीण काशिनाथ राणे यांनी 1% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.630981 दि.25/03/2019 चा रक्कम रु.33000/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. प्रथम क्रमांकावर असलेले मक्तेदार श्री प्रवीण काशिनाथ राणे यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 3024311-/ मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.** 3024311/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 5 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे यांचे** निविदा रक्कमेपेक्षा 7.65%कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 3024311/- मात्र चे खर्चास तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे प्रकरण 7 कलम 73 (क) मधील तरतुदीनुसार L1 मक्तेदाराशी संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ७)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१७ अंतर्गत अयोध्यानगर परिसरात ठिकठिकाणी गटारी बांधणे कामी मक्तेदार प्रवीण काशिनाथ राणे यांचे निविदा रक्कमेवर ६.३०% कमीचे दरानुसार रक्कम रु.२८,१५,५६९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२८पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 5 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.17 अंतर्गत अयोध्यानगर परिसरात ठिकठिकाणी गटारी बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 59 दि. 07/12/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत म. विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2018/प्र.क्रं. 170 अ (27)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 28/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. 3004876/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | **प्रवीण काशिनाथ राणे** | **निविदा रक्कमेपेक्षा 6.30% कमीचे दराने** | 2815569/- |
| 2 | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर 1.50% जास्तीचे दराने | 3049949/- |
| 3 | सुनिल एन पाटील | निविदा रक्कमेवर 3% जास्तीचे दराने | 3095022/- |
| 4 | दिलीप शांतीलाल तिवारी | निविदा रक्कमेइतकेच | 3004876/- |
| 5 | साईभूमी कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर 4% जास्तीचे दराने | 3125071/- |
| 6 | स्वामी कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर 2% जास्तीचे दराने | 3064974/- |

मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 6.30% कमीचे दर आले. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे** यांनी 1% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.740187 दि.26/03/2019 चा रक्कम रु.25000/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे** यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु 2815569/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.2815569/-** मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 5 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार **प्रवीण काशिनाथ राणे यांचे** निविदा रक्कमेपेक्षा 6.30% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम **रु.2815569/- मात्र** चे खर्चास तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे प्रकरण 7 कलम 73 (क) मधील तरतुदीनुसार L1 मक्तेदाराशी संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ८)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०१ मधील महावीर नगर सं.नं.३०४/१/२ मधील ओपनस्पेसला कुंपण करणे व प्रभाग क्र.१ मधील स.नं.३०१/१ व ३०२/२ मधील ओपनस्पेसला कुंपण करणे व प्रभाग क्र.१ मधील मनपा उर्दुशाळा क्र.१५ ला कुंपण भिंत बांधणे कामी मक्तेदार दि लॅन्ड मार्क यांचे निविदा रक्कमेवर १.३७% कमीचे दरानुसार रक्कम रु.३१,०१,६१९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 5 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.1 मधील महावीर नगर सं.नं.304/1/2 मधील ओपनस्पेसला कुंपण करणे व प्रभाग क्र.1 मधील स.नं.301/1 व 302/2 मधील ओपनस्पेसला कुंपण करणे व प्रभाग क्र.1 मधील मनपा उर्दुशाळा क्र.15 ला कुंपण भित बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 59 दि. 07/12/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकरीता

मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2018/प्र.क्रं. 170 अ (27)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 28/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.3144701/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | स्वामी कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर 1.5% जास्तीचे दराने | 3191872/- |
| 2 | प्रविण काशिनाथ राणे | निविदा रक्कमेपेक्षा 0.50% कमीचे दराने | 3128978/- |
| 3 | पद्यामलय कंन्स्ट्रकशन<br>प्रो.पा. अतुल जी. बाहेती | निविदा रक्कमेपेक्षा 13.11% कमीचे दराने | 2732431/- |
| 4 | दि लॅन्ड मार्क | निविदा रक्कमेपेक्षा 1.37% कमीचे दराने | 3101619/- |

मक्तेदार पद्यामलय कंन्स्ट्रकशन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 13.11% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. परंतु मक्तेदार पद्यामलय कंन्स्ट्रकशन यांनी निविदे सोबत 4.11% परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन रक्कम रु.129247/- मात्रचा डि.डि.निविदा अटीशर्ती नुसार स्कॅन करुन निविदे सोबत सादर करणे आवश्यक होते.मक्तेदार यांनी सदरचा डि.डि.सादर केलेला नसल्याने त्यांनी सादर केलेली ई निविदा रद्द करणे योग्य होईल. तसेच दुस-या क्रमांकावर असलेले मक्तेदार **दि लॅन्ड मार्क** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 1.37% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार दि लॅन्ड मार्क यांनी 1% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.740185 दि.25/03/2019 चा रक्कम रु.31500/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. दुस-या क्रमांकावर असलेले मक्तेदार दि लॅन्ड मार्क यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु 3101619-/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.** 3101619/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 5 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार दुस-या क्रमांवरील मक्तेदार **दि लॅन्ड मार्क यांचे** निविदा रक्कमेपक्षा 1.37% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम **रु.** 3101619/- **मात्र** चे खर्चास तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे प्रकरण 7 कलम 73 (क) मधील तरतुदीनुसार मक्तेदाराशी संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ९)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१४ आदर्श नगर जुना आरटीओ ऑफिस जवळील स.नं.४३९ मधील खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग करणे व प्रभाग क्र.१६ अंतर्गत टी.एम.नगर मधील खुली जागेस संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेवर ११% कमीचे दरानुसार रक्कम रु.३५,१५,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३०पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 5 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.14 आदर्श नगर जुना आरटीओ ऑफिस जवळील स.नं.439 मधील खुल्याजागेस चेनलिंक फेन्सींग करणे व प्रभाग क्र.16 अंतर्गत टी.एम.नगर मधील खुली जागेस संरक्षण भिंत बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 59 दि. 07/12/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय

क्रमांक- संकीर्ण-2018/प्र.क्रं. 170 अ (27)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 28/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.3949528 /- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन<br>प्रो.पा.विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेपेक्षा 11% कमीचे दराने | 3515080/- |
| 2 | कासट स्टोन इंडस्ट्रीज<br>प्रो.पा.शरद शिवनारायण कासट | निविदा रक्कमेवर 8% जास्तीचे दराने | 4265490/- |
| 3 | पद्यमालया कंन्स्ट्रक्शन<br>प्रो.पा.अतुल जी बाहेती | निविदा रक्कमेपेक्षा 16.02% कमीचे दराने | 3316814/- |
| 4 | श्री गजानन एन्टरप्राईजेस<br>प्रो.पा. भाग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेवर 5% जास्तीचे दराने | 4147004/- |

मक्तेदार पद्यामलय कंन्स्ट्रकशन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 16.11% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. परंतु मक्तेदार पद्यामलय कंन्स्ट्रकशन यांनी निविदे सोबत 7.11% परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन रक्कम रु.280811/- मात्रचा डि.डि.निविदा अटीशर्ती नुसार स्कॅन करुन निविदे सोबत सादर करणे आवश्यक होते.मक्तेदार यांनी सदरचा डि.डि.सादर केलेला नसल्याने त्यांनी सादर केलेली ई निविदा रद्द करणे योग्य होईल.तसेच दुस-या क्रमांकावर असलेले मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 11% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांनी 2% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.001752 दि.26/03/2019 चा रक्कम रु.79000/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे .दुस-या क्रमांकावर असलेले मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु 3515080-/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.** 3515080/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 5 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार दुस-या क्रमांवरील मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपक्षा 11% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम **रु.** 3515080/- मात्र चे खर्चास तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे प्रकरण 7 कलम 73 (क) मधील तरतुदीनुसार मक्तेदाराशी संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ. हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. १०)** जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती कामी ३ ट्रॅक्टर व ९ मजुर १२ महिन्या करीता पुरविणे कामी मक्तेदार एस.के.कॉन्ट्रॅक्टर यांचे वाटाघाटीनंतरचे आलेले दर स्विकृत करणेस व त्याकामी एकूण रक्कम रु.३९,५२,९५०/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती कामी 3 ट्रॅक्टर व 9 मजुर 12 महिन्या करीता पूरविणे कामी मक्तेदार एस.के. कॉन्ट्रॅक्टर यांचे दर प्रति मजुर रु. 545/- प्रति दिवस व प्रति ट्रॅक्टर इंधन व चालकासह रु. 2070/- प्रति दिवस या प्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटा घाटी करणे साठी बोलविले असता त्यांनी समक्ष हजर न राहता आ.क्र./सा.बा./68 दि. 08/04/2019 रोजी पत्र दिले त्यात त्यांनी खालील प्रमाणे दिलेल्या दरात सदरचे काम करणेस लेखी संमती दिलेली आहे.

| निविदा धारकांचे नांव | प्रति दिन रक्कम रु. | एक दिवसाठी अपेक्षित खर्च | एका वर्षासाठी अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| एस.के. कॉन्ट्रॅक्टर | एका मजुरासाठी प्रति दिन रु. 520/- | प्रति मजुर रु. 520 X 9 = 4680/- एक दिवसा साठी | 9 मजुर करीता रु. 4680 X 365 दिवस = 1708200/- |
| 3 ट्रॅक्टर ट्रॉली वाहन चालक व इंधना सह | एका दिवसा करीता एका ट्रॅक्टरला रु. 2050/- | प्रति ट्रॅक्टर 2050 X 3 ट्रॅक्टर = 6150/- एका दिवसा करीता | 3 ट्रॅक्टर एका दिवसाला रु. 6150 X 365 दिवस = 2244750/- |
| अंदाजीत रक्कम रु. :- 3345225/- | | | |

सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कडुन मागविण्यात आलेले किमान दर तसेच म.न.पा. प्रशासकीय आदेश क्र. जा.क्र./आरोग्य वि./ 08/ दि. 15/12/2018 अन्वये मंजुर केलेले ट्रॅक्टर ट्रॉली , वाहन चालक व इंधनासह दर पाहता वरील आलेले दर स्विकृत करुन सदरचे दरानुसार रक्कम रु. 1708200 + 2244750 = 3952950/- मात्र चा खर्च रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या मनपा लेखा शिर्षाखाली करणेस तसेच मक्तेदार यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापी किमान वेतन कायद्याप्रमाणे संबंधीत मजुराचे वेतन होणे आवश्यक राहील या अटीवर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ. हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ११)** सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालयास सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी आवश्यक वाचन साहित्य (दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके व दिवाळी अंक ऑक्टोबर-२०१९ इ.) १) ग्रंथालय व त्याची उपकेंद्रे १ व २, २) म.न.पा.विषयक बातम्यांची कात्रणे, ३) अधिकारी व पदाधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालय इत्यादींकरीता खरेदी करणे कामी पुरवठादार जय गजानन न्युज पेपर, २०, साई गीता नगर जळगांव यांचे छापिल किंमतीवरील सुट दर सर्वात जास्तीचे असल्याने त्यांचेकडून वाचन साहित्य खरेदी करणे व त्यासाठी येणाऱ्या वार्षिक अपेक्षित एकूण रक्कम रु.१,७५,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका संचलित साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालयाकरीता दरवर्षाप्रमाणे सन २०१९-२० या आर्थिक वित्तिय वर्षाकरीता लागणारे दैनिके (स्थानिक व बाहेरील) तसेच साप्ताहिके, पाक्षिके, मासिके व दिवाळी अंक २०१९ इत्यादी अत्यावश्यक वाचनसाहित्य मुख्य ग्रंथालयाकरीता व त्याची उपकेंद्रे तसेच जळगांव म.न.पा. विषयक बातम्यांची कात्रणे, अधिकारी व पदाधिकारी यांचे म.न.पा.प्रशासकीय कार्यालयांस पुरवठा करणेकामी महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.३ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार परिपत्रकाव्दारे तसेच सहा.ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग, नाशिक व जिल्हा ग्रंथालय अधिकारी,जळगांव यांचेकडील आदेशान्वये व अनुदानामधून मार्गदर्शक सुचना दिल्याप्रमाणे इच्छुक पुरवठादार यांचेकडून सिलबंद पाकिटांतुन दरपत्रके मागविणेस सहाय्यक आयुक्त यांनी दि.२८/०५/२०१९ रोजी दिलेल्या मंजूरीनूसार इच्छुक पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आली विहीत मुदतीत एकूण ०३ इच्छुक पुरवठादार यांची सिलबंद पाकिटे प्राप्त झाली. आलेल्या दरपत्रकांच्या आधारे वाचन साहित्य (दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके व दिवाळी अंक ऑक्टोंबर-२०१९ इ.) खरेदी करणेकामी पुरवठादार व त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | पुरवठादार एजन्सीचे नाव व पत्ता | पुरवठा वाचन साहित्य | छापिल किंमती वरील सुट दर (टक्केवारीत) |
|---|---|---|---|
| १ | जय गजानन न्युज पेपर, २०,साई गीता नगर,जळगांव | स्थानिक दैनिक | मुळ छापिल किंमतीवर १% सूट |
| | | बाहेरील दैनिक (मराठी,हिंदी,इंग्रजी) | सूट नाही |
| | | सर्व प्रकारची साप्ताहिके (मराठी,हिंदी,इंग्रजी) | मुळ छापिल किंमतीवर २% सूट |
| | | सर्व प्रकारची पाक्षिके (मराठी,हिंदी,इंग्रजी,गुजराथी) | मुळ छापिल किंमतीवर २% सूट |
| | | सर्व प्रकारची मासिके (मराठी,हिंदी,इंग्रजी,गुजराथी) | सूट नाही |
| | | सर्व प्रकारची त्रैमासिके | १% सूट |
| | | सर्व प्रकारची दिवाळी अंक (ऑक्टोबर-२०१९) | मुळ छापिल किंमतीवर ५% सूट |

ग्रंथालयीन विभागासाठी सदरचे दैनिके (१) मुख्य ग्रंथालय व ग्रंथालयाचे ०२ उपकेंद्रे सानेगुरुजी कॉलनी व आदर्श नगर, मेहरुण शिवार आणि म.न.पा.विषयक बातम्यांची कात्रणे, दैनंदिन दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके व इतर अनुदानामधून खरेदी करणेकामी, (२) म.न.पा.त असलेल पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी व इतर यांना दैनिके म.न.पा.फंडातून खरेदी करणेकामी ३६५ दिवसांकरीता प्रत्येकास ५ ते १० प्रतींत दैनिके खरेदी करणेकरीता अंदाजित वार्षिक खर्च रु.१,७५,०००/- मात्र अपेक्षित आहे.

सदर कामी जय गजानन न्युज पेपर,जळगांव यांनी दिलेले सुट दर वाजवी व योग्य असल्याने त्यांचे आलेले सुट दरांस व सन २०१९-२० करीता दैनिके व अत्यावश्यक वाचनसाहित्य खरेदीकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१,७५,०००/- मात्र चे अंदाजपत्रकिय खर्चास दिनांक १७/०६/२०१९ रोजी मान्यता देण्यात आलेली असल्याने वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ चे धोरणात्मक बाबीकरीता सन २०१९-२० या आर्थिक वित्तिय वर्षाकरीता लागणारे वाचन साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या वार्षिक एकूण रक्कम रु.१,७५,०००/- मात्र चे खर्चास शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/दिनांक १ डिसेंबर २०१६ सुधारीत नियमपुस्तिका मधील (९) नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ३.२.३ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ. हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. १२)** महानगरपालिका आरोग्य विभागाकडे कार्यरत असलेले १० नग ट्रॅक्टर व ०४ नग फ्रंट एन्ड लोडरची दुरुस्ती (पाचवी सर्व्हिसींग) करणे कामी रक्कम रु.२,७४,७९६/- मात्र खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, आरोग्य विभागाकडे अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेले 10 नग ट्रॅक्टर व 04 नग फ्रंट एन्ड लोडरची पाचवी सर्व्हिसींग करणे आवश्यक व गरजेचे आहे.

मे.सिध्दी ऑटो मोबाईल्स ट्रॅक्टर सेल्स & सर्व्हिस जळगांव यांच्याकडील कोटेशन दि.24/01/2019 रोजी दिलेले असुन संबंधीतांनी यापुर्वी दि.21/02/2018 रोजी दिलेल्या पत्रानुसार आणि कोटेशननुसार ट्रॅक्टरची पाचवी सर्व्हिसींग 1850 तासाला करणे अनिवार्य आहे व फ्रंट एन्ड लोडरची पाचवी सर्व्हिसींग 1700 तासाला करणे अनिवार्य आहे.

## ट्रॅक्टर्स व फ्रंट एन्ड लोडर दुरुस्ती (पाचवी सर्व्हिसींग) चा तपशिल खालील प्रमाणे:-

| अ.क्र | वाहन क्रं. | पार्टचे नांव | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | Tractor | | | |
| 1 | एम एच 19 एम 0841 | M Star Oil | 7.5X10 = 75 ltr | 2025X10 | 20,250/- |
| 2 | एम एच 19 एम 084२ | M Star Oil | 1X10 = 10 ltr | 276X10 | 2,760/- |
| 3 | एम एच 19 एम 0843 | Oil Filter | 1X10 = 10 nos | 167X10 | 1,670/- |
| 4 | एम एच 19 एम 0844 | Diesel Filter | 1X14 = 14 nos | 140X14 | 1,960/- |
| 5 | एम एच 19 एम 0845 | Diesel Filter | 1X14 = 14 nos | 116X14 | 1,624/- |
| 6 | एम एच 19 एम 0846 | Air Filter | 1X10 = 10 nos | 151X10 | 1,510/- |
| 7 | एम एच 19 एम 0847 | M Star OIB | 20 LtrX28 nos | 5,323X28 | 1,49,044/- |
| 8 | एम एच 19 एम 0848 | M-Star OIB | 5 LtrX10 nos | 1,358X10 | 13,580/- |
| 9 | एम एच 19 एम 0849 | Hyd Filter | 1X14 = 14 nos | 870X14 | 12,180/- |
| 10 | एम एच 19 एम 0850 | Staner Filter | 1X10 = 10 nos | 1308X10 | 13080/- |
| | | "O" Ring | 1X10 = 10 nos | 15X10 | 150/- |
| | | Packing Staner | 1X10 = 10 nos | 20X10 | 200/- |
| Front End Loader | | Lift Cover Packing | 1X10 = 10 nos | 294X10 | 2,940/- |
| 11 | एम एच 19 एम 0851 | Anabond Tube | 1X28 = 28 nos | 50X28 | 1,400/- |
| 12 | एम एच 19 एम 0852 | Fan Belt 415 | 1X10 = 10 nos | 224X10 | 2,240/- |
| 13 | एम एच 19 एम 0853 | Altornator Belt | 1X10 = 10 nos | 210X10 | 2,100/- |
| 14 | एम एच 19 एम 0854 | M-Star Oil | 10X4 = 40 Ltr | 2,792X4 | 11,168/- |
| | | Oil Filter | 1X4 = 4 nos | 214X4 | 856/- |
| | | Air Filter Inner | 1X4 = 4 nos | 588X4 | 2,352/- |
| | | Air Filter Outer | 1X4= 4 nos | 820X4 | 3,280/- |
| | | Staner Filter | 1X4 = 4 nos | 711X4 | 2,844/- |
| | | "O" Ring (Novo) | 1X4 = 4 nos | 10X4 | 40/- |
| | | "O" Ring (Novo) | 1X4 = 4 nos | 6X4 | 24/- |
| | | "O" Ring (Novo) | 1X4 = 4 nos | 6X4 | 24/- |
| | | Lift Cover (Novo) Packing | 1X4 = 4 nos | 376X4 | 1,504/- |
| | | Fan Belt (Novo) | 1X4 = 4 nos | 384X4 | 1,536/- |
| | | Servicing Labour Charges | 1X14 = 14 | 300X14 | 4,200/- |
| | | Washing | 1X14 = 14 | 200X14 | 2,800/- |
| | | OIB Oil Change & Cleaning | 1X14 = 14 | 500X14 | 7,000/- |
| | | Hub Greasing | 1X14 = 14 | 250X14 | 3,500/- |
| | | 1 kg Grease M-Star | 1X14 = 14 | 320X14 | 4,480/- |
| | | | 1X10 = 10 | 150X10 | 1,500/- |
| | | Nipple Greasing | 1X4 = 4 nos | 250X4 | 1,000/- |
| | | Nipple Greasing | | | |
| | | | | Total Amount | 2,74,796/- |

10 नग ट्रॅक्टर व 04 नग फ्रंट एन्ड लोडर असे एकुण 14 नग (ट्रॅक्टर & फ्रंट एन्ड लोडर) हे शहरातील दैनंदिन कचरा वाहतुक करणे / कचरा उचलण्याकामी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असून सदर ट्रॅक्टर & फ्रंट एन्ड लोडरचे दुरुस्ती (पाचवी सर्व्हिसींग) कामे करणे आवश्यक गरजेचे असल्याने मे.सिध्दी ऑटो मोबाईल्स ट्रॅक्टर सेल्स & सर्व्हिस जळगांव यांच्याकडील कोटेशन नं.2207, 2209, 2210, 2211, 2212, दि.24/01/2019 अन्वये सदर ट्रॅक्टर आणि फ्रंट एन्ड लोडरची दुरुस्ती (पाचवी सर्व्हिसींग) करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.2,74,796/- (अक्षरी:- दोन लक्ष चौ-याहत्तर हजार सातशे शहानऊ रुपये) मात्र चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 5 (2) (2) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. १३)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०४/०२/२०१९ ते दि.१०/०२/२०१९, दि.११/०२/२०१९ ते दि.१७/०२/२०१९, दि.१८/०२/२०१९ ते दि.२४/०२/२०१९, दि.२५/०२/२०१९ ते दि.०३/०३/२०१९, दि.०४/०३/२०१९ ते दि.१०/०३/२०१९, दि.११/०३/२०१९ ते दि.१७/०३/२०१९, दि.१८/०३/२०१९ ते दि.२४/०३/२०१९, व दि.२५/०३/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३४ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की,** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०४/०२/२०१९ ते दि.१०/०२/२०१९, दि.११/०२/२०१९ ते दि.१७/०२/२०१९, दि.१८/०२/२०१९ ते दि.२४/०२/२०१९, दि.२५/०२/२०१९ ते दि.०३/०३/२०१९, दि.०४/०३/२०१९ ते दि.१०/०३/२०१९, दि.११/०३/२०१९ ते दि.१७/०३/२०१९, दि.१८/०३/२०१९ ते दि.२४/०३/२०१९, व दि.२५/०३/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते** :- **१४** **प्रतिकुल मते** :- **००**

**सुचक** :- **श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक** :- **सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. १४)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./१९/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१४ मेहरुण अंतर्गत स.नं.२६९/२A मधील खुल्या जागेस कुंपणभिंतीस बांधणे व प्रभाग क्र.१४ मधील नुतन आदर्श नगर मेहरुण स.नं.४४४ मधील ओपनस्पेसमध्ये जॉगिंग ट्रॅक बांधणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दरानुसार रक्कम रु.१६,४४,६३३/- मात्र खर्चाची संविंदा.

२) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२०/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.११ मेहरुण अंतर्गत पिंप्राळा गट नं.१३२ मधिल ओपनस्पेसला कंपाऊंडवॉल बांधणे व प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१५२/४/१+२ दत्त डिगंबर सोसायटी मधिल ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींग करणे व लोखंडी गेट बसविणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१८,५७,१०६/- मात्र खर्चाची संविंदा.

३) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२१/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.८ निमखेडी गट नं.८० टिळक नगर ओपनस्पेसला चेनलींग फेन्सींग करणे व प्रभाग क्र.१४ मेहरुण अंतर्गत स.नं.२६१ मधील खुला जागेस कुंपणभिंत्तीस बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१५,५९,९९७/- मात्र खर्चाची संविंदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२२/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.९५/१ आर.एम.एस.कॉलनी मधिल नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व प्रभाग क्र.०७ पिंप्राळा शिवार गट नं.५४/२ शिवकॉलनी येथील खुल्याजागेमध्ये चेनलींक फेन्सींग करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१२,९०,५७४/- मात्र खर्चाची संविंदा.

५) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२३/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९

पिंप्राळा दांडेकर नगर ओपनस्पेस पाण्याचे टाकीला चेनलींक फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.९,११,४७७/- मात्र खर्चाची संविंदा.

६) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२४/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१९ मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.१६४ (P) व १८८ (P) मध्ये आर.सी.सी.गटर व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.२०,२४,२३२/- मात्र खर्चाची संविंदा.

७) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२५/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०४ गुरुनानक नगर मधील महिला सार्व.संडाशीजवळील जागेस नविन कंपाऊंडवाल बांधणे व प्रभाग क्र.०४ गुरुनानक नगर मधील भागात श्री.रमेश धवलपुरे, श्री.गंगाराम शिंदे व श्री.चांगरे यांचे घराजवळील रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व प्रभाग क्र.६ अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्र.८६४१ दत्तकॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०१% कमीचे दरानुसार रक्कम रु.१६,४८,८९५/- मात्र खर्चाची संविंदा.

८) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२६/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०८ मधील वाघुळदे नगर / बीजे नगर व भोईटेनगर मधील ओपनस्पेस मध्ये खेळणी व ओपन जिम आयटेम बसविणे व प्रभाग क्र.०८ मधील निमखेडी गट नं.११५/२ ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०१% कमीचे दरानुसार रक्कम रु.१८,१३,०६९/- मात्र खर्चाची संविंदा.

९) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२७/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ मधील अनुपम सोसायटी व शिंदे नगर (पिंप्राळा शिवार) ओपनस्पेसला चेनलींक फेन्सींग कंपाऊंड करणे व प्रभाग क्र.०९ मध्ये पिंप्राळा गट नं.१/२ पांढरी प्लॉट परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१५,९९,८५९/- मात्र खर्चाची संविंदा.

१०) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२८/दि.१४/०६/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०६ अंतर्गत खांन्देशमिल कॉलनी येथील श्री.प्रकाश नाईक यांचे घरापासुन ते डॉ.सहस्त्रबुध्दे यांचे दवाखान्यापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे व प्रभाग क्र.०६ अंतर्गत तुकारामवाडी,जानकीनगर व कासमवाडी परिसरात गटारीवर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व प्रभाग क्र.०६ अंतर्गत प्रताप नगर येथील खुलीजागा जळगांव न.भु.क्र.३१७८ येथे बगिचा खेळणी पुरवीणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दरानुसार रक्कम रु.१९,३७,५७८/- मात्र खर्चाची संविंदा.

११) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./२९/दि.१७/०६/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी रक्कम रु.१०,७५,८३०/- + वाहतुक खर्च रक्कम रु.८४,७८८/- असा एकुण रक्कम रु.११,६०,६१८/- मात्रचा खर्च सर्वसाधारण रस्ताअनुदाना अंतर्गत या लेखा शिर्षका अंतर्गत करणेची संविंदा.

१२) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./३०/दि.२१/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्र.१४ आदर्शनगर मधील मेहरुण येथील महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेवर (स.नं.४३७/५ अ+५ ब ओपनस्पेस) सामाजिक सभागृह बांधकाम करणे कामी मक्तेदार स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.२८% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,३४,४८०/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :-** **सौ. हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :-** **सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- जादा विषय क्र. ०१)** कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल दवाखान्याच्या मागील बाजूस असलेले प्रभाग समिती क्रं. २ चे कार्यालयाची जागा डायनॉस्टीक सेंटरसाठी देणेबाबत व स्वंसेवी संस्थाकडुन स्पर्धात्मक निविदा मागविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेची लोकसंख्या साधारण ५ लाखाच्या वर आहे. जळगांव शहर महानगरपालिकेची सदयाची आर्थिक परिस्थिती सध्या बिकट आहे. जळगांव शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता शहरातील नागरिकांना आवश्यक त्या वैदयकिय सेवा पुरविणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. रुग्णाचे रोगाचे निदान करणे व त्यावर वैदयकिय उपचार करणेसाठी आवश्यक असलेले कर्मचारी वर्ग व साधनसामग्री महानगरपालिकेकडेस पुरेशी नाही. शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील नागरिक शहराकडे उदरनिवार्हसाठी येत असून शहरातच स्थायिक होतात त्यामुळे शहराची लोकसंख्येत व स्लम एरियात झपाटयाने वाढ होत आहे. स्लम एरियातील गोरगरीबाना रोगाचे निदान करणेसाठी आवश्यक असणारी मशिनरी उदा. सोनोग्राफी, सिटीस्कॅन, एम.आर.आय. रक्ताच्या चाचण्या, प्रयोगशाळा व इतर तस्यम वैदयकिय क्षेत्रातील खर्चिक स्वरुपाच्या चाचण्या करणे हया महानगरपालिकेकडेस उपलब्ध नाही.

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत दवाखान्यांमध्ये मागील ३ वर्षामध्ये बाहयरुग्णांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| सन | बाहयरुग्णांची संख्या |
|---|---|
| २०१६-१७ | ७३५९१ |
| २०१७-१८ | ६०३२४ |
| २०१८-१९ | ७०७९४ |
| एकूण | २०४७०९ |

जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत मागील ३ वर्षात एकूण २०४७०९ बाहयरुग्णंना वैदयकीय सेवा पुरविण्यात आली. साधारणपणे २५-३०% रुग्णांना उपचारासाठी विविध वैदयकीय चाचण्या कराव्या लागतात. अशा रुग्णांसाठी महानगरपालिकेव्दारे लॅब व इतर चाचण्याची सेवा उपलब्ध करुन देणेसाठी अंदाजित खर्च रक्कम रुपये ३.५ ते ४ कोटी येऊ शकतो. परंतु महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेस शक्य नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६३ (६) अन्वये महानगरपालिकेच्या आवश्यक कर्तव्यामध्ये सार्वजनिक रुग्णालये व दवाखाने बांधणे, ती सुव्यवस्थित ठेवणे व सार्वजनिक वैदयकिय सहाय्यासाठी आवश्यक अशा उपाययोजना करण्याकामी वाजवी व पुरेशी तरतूद करणे याचा समावेश होतो.

उक्त अधिनियमातील कलम ६६ अन्वये महानगरपालिकेने पार पाडावयाच्या ऐच्छिक कर्तव्यामध्ये कलम ६६ (४) नुसार विविध बाबीसंबंधी प्रयोगशाळा स्थापन करणे, चालविण्यासंबंधी तरतूद आहे.

शहरातील गरजू नागरिकांना उपरोक्त सुविधा देणे आवश्यक असले तरी महानगरपालिकेची सध्याची गंभीर आर्थिक परिस्थिती विचारात घेता सार्वजनिक आरोग्याच्या व रुग्णाच्या वैयक्तिक आरोग्यासाठी तरतूद करणे, महानगरपालिकेस अशक्य आहे. तथापि, नागरिकांना या सुविधांपासुन वंचित ठेवणे योग्य होणार नाही. महानगरपालिकेने पार पाडावयाची कर्तव्ये अधिनियमाच्या कलम ६६ अ अन्वये स्वत: किंवा एखादया अभिकरणव्दारे (Agency) पार पाडू शकते.

उक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (४) अन्वये एखादया अभिकरणव्दारे (Agency) पार पाडण्यासाठी दिल्यास जळगांव शहरातील नागरिकांना माफक दरांमध्ये सेवा उपलब्ध होतील तसेच जळगांव शहरामध्ये खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या गरीब व्यक्तींना रक्तांची व इतर वैदयकीय चाचण्या या अशा संस्थेच्या रुग्णालयात माफक दरात उपलब्ध होऊ शकतील.

वर नमूद वस्तुस्थितीचा विचार जळगांव शहरातील नागरिकांना आजाराचे वेळेत अचूक निदान रेडीओलॉजी, (सि.टी.स्कॅन व एक्स रे विभाग) अदयावत प्रयोगशाळा संबंधीत उत्तम सेवा सर्व खर्च करुन माफक दरात उपलब्ध करुन देण्याबाबत जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा दवाखाना कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल हॉस्पीटलच्या मागील बाजुस असलेले प्रभाग समिती क्रं.२ ची जागा ३० वर्ष कालावधीसाठी भागीदारी तत्वावर महानगरपालिकेच्या अटी व शर्तीचे अधिन राहून देणे बाबत स्पर्धात्मक निविदा काढून नोंदणीकृत संस्था, ट्रस्ट, अशासकीय सेवा भावी संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविणेत यावे. सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) पध्दतीने पुढील कार्यवाही

करावयाची असल्याने मनपा फक्त जागा उपलब्ध करुन देईल व खाजगी संस्था सर्व यंत्रे, मनुष्यबळ, साहित्य, सोई-सुविधा उपलब्ध करुन देईल. नियुक्ती संस्थेला मालमत्ता कर दयावा लागणार नाही.

प्रथमत: प्रचलित (Central Government Health Scheme) केंद्र सरकार आरोग्य योजना दराप्रमाणे विविध चाचण्याच्या दरांचा विचार करुन प्रस्तावित दर निश्चित करावे तद्नंतर त्यामध्ये दरवर्षी ५% नैसर्गिक दरवाढ ठेवण्याबाबत तरतूद करणेत यावी. निविदेतील अर्हता पुर्ण करणाऱ्या संस्थांचे देकार उघडून जास्तीत जास्त स्वामित्वधन (Royalty) देणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. महानगरपालिकेने निश्चित केलेली न्यूनतम रॉयल्टी रक्कम रु.१.०० लाख गृहीत धरुन जास्तीत जास्त रॉयल्टी देणाऱ्या व सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. या रॉयल्टीमध्ये दरवर्षी ५% नैसर्गीक वाढ अपेक्षित राहील. ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून कार्यरत असलेल्या नोंदणीकृत संस्था, ट्रस्ट, अशासकीय सेवा भावी संस्था Non Government Organization (NGO's) यांच्याकडून स्पर्धात्मक निविदा काढून प्रस्ताव मागवुन उक्त नमूद केलेल्या बाबींची पुर्तता करणाऱ्या संस्था, ट्रस्ट, अशासकीय सेवा भावी संस्था यांना कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल दवाखान्याच्या मागील बाजुस असलेली अंदाजित ३४० चौ.मी.जागा (प्रभाग समिती क्रं.२ चे कार्यालयाची जागा) डायनॉस्टीक सेंटरसाठी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच प्रभाग समिती क्रं.२ चे कार्यालय त्याच प्रभागातील म.न.पा.मालकीच्या लाठी शाळा क्र.३५ येथिल रिक्त असलेल्या ५ रुम मध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सदर प्रभाग समिती कार्यालय स्थलांतरित करणे आधी म.न.पा.शाळा क्र.३५ मधिल रिक्त असलेल्या वर्ग खोल्यांमध्ये आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणेस ही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :- श्री. ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

सही/-

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**